पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१९ ■ शुक्रवार, दि.२९ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# कोरडवाहू शेतकरी संकटात

## हवामान खात्याच्या दुसऱ्या अंदाजाने शेतकरी चिंतेत
## महाराष्ट्रात यंदा कमी पाऊस, उष्णतेची लाट अधिक



प्रतिनिधी २९ मे

**पुणे :** महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांची धाकधूक वाढवणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. भारत हवामान विभागाने आज नैऋत्य मान्सून २०२६ साठी दुसऱ्या टप्प्याचा दीर्घकालीन अंदाज जाहीर केला आहे. या ताज्या अंदाजानुसार, महाराष्ट्रासाठी यंदाच्या मान्सून हंगामात अत्यंत चिंताजनक चित्र समोर आले आहे. राज्यात यंदा पाऊस सामान्यपेक्षा कमी पडण्याची आणि उष्णतेच्या लाटा तीव्र राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, देशभरात यंदाच्या मान्सून हंगामात (जून ते सप्टेंबर २०२६) दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. हे प्रमाण सामान्यपेक्षा कमी मानले जाते. महाराष्ट्र हा प्रामुख्याने मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्प या दोन्ही विभागांत मोडतो. या दोन्ही विभागांत यंदा सामान्यपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. मध्य भारतात ४३ टक्के तर दक्षिण द्वीपकल्पात ४५ टक्के संभाव्यता कमी पावसाची आहे. दरम्यान, हवामान विभाग जुलै २०२६ या महिन्याचा पावसाचा सविस्तर अंदाज जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करणार आहे.

### हवामान विभागाकडून प्रशासनाला ५ महत्त्वाच्या सूचना

१. पाणी साठा आणि संवर्धनाच्या उपाययोजना राबवाव्यात.
२. शेतीसाठी आपत्कालीन नियोजन करावे.
३. उष्माघाताच्या दृष्टीने थंड निवारा केंद्रे सुरू ठेवावीत.
४. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी.
५. आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी.

### कोअर झोनमधील कोरडवाहू शेती धोक्यात?

महाराष्ट्रातील विदर्भ , मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश भाग हे मान्सून कोअर झोन मध्ये येतात. हाच झोन देशातील आणि राज्यातील बहुतांश कोरडवाहू शेतीचा मुख्य कणा आहे. आये एम डी च्या अंदाजानुसार, या कोअर झोनमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची ४३ टक्के शक्यता आहे. त्यामुळे चालू वर्षातील खरीप हंगामावर याचा विपरित परिणाम होण्याची भीती शेतकरी वर्गात व्यक्त केली जात आहे. जून २०२६ या पहिल्या महिन्यातही देशभरात सरासरीच्या ९२ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस राहण्याची शक्यता असल्याने, महाराष्ट्रात जून उजाडला तरी पावसाची ओढ कायम राहू शकते.

### जून महिन्यात रात्रीही उकाडा; उष्णतेच्या लाटांचा इशारा

पावसाची तूट असतानाच, आयएमडी ने जून २०२६ मध्ये महाराष्ट्राच्या अनेक भागांत सामान्यपेक्षा अधिक उष्णतेच्या लाटांचा इशारा दिला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि काही अंतर्गत भागांमध्ये कमाल तापमान सामान्यपेक्षा अधिक राहील. धक्कादायक बाब म्हणजे, किमान तापमानही सामान्यपेक्षा जास्त राहणार असल्याने रात्रीच्या वेळीही नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागणार आहे.

### 'एल निनो'चे संकट गडद

सध्या प्रशांत महासागरावर न्यूट्रल परिस्थिती असली तरी, हवामान विभागाने स्पष्ट केले आहे की, मान्सून हंगामाच्या उत्तरार्धात 'एल निनो' परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. ऐतिहासिक नोंदीनुसार, ज्या ज्या वर्षी एल निनो सक्रिय होतो, त्या वर्षात भारतात, विशेषतः मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाची तूट अधिक जाणवते. सामान्यपेक्षा कमी पाऊस पडल्यास त्याचे थेट दुष्परिणाम शेती , पाणीपुरवठा , जलविद्युत निर्मिती आणि एकूणच पर्यावरणावर होऊ शकतात, असे आय एम डी ने आपल्या अहवालात नमूद केले आहे. महाराष्ट्रात आधीच पाणीटंचाईची तीव्र समस्या असलेल्या मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांसाठी हा अंदाज अधिकच चिंताजनक आहे.

# गजानन नागरी घोटाळा; आरोपीला पीसीआर

प्रतिनिधी २९ मे

**अकोला:** शहरातील डाबकी रोडवर असलेल्या 'गजानन नागरी सहकारी पतसंस्थेत' १६ कोटी ७९ लाख २७ हजार ९३० रुपयांचा आर्थिक अपहार उघडकीस आला आहे. या प्रकरणी येथील आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत संस्थेचे व्यवस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) नंदकिशोर नारायण आवारे (५७) यांना अटक केली आहे. न्यायालयात हजर केले असता, आरोपीला ३ जूनपर्यंत पोलिस कोठडी (पीसीआर) सुनावली आहे. गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अनिल जुमळे व त्यांचे पथक करत आहेत. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी नंदकिशोर आवारे यांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. मात्र, दुसरे मुख्य आरोपी व संस्थेचे अध्यक्ष नारायण आवारे हे ८३ वर्षांचे आहेत. त्यांनी येथील सर्वोपचार रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहून आपली प्रकृती चांगली नसल्याचा वैद्यकीय अहवाल सादर केला. त्यांच्या वाढत्या वयाचा व खालावलेल्या प्रकृतीचा विचार करून, पोलिसांकडून त्यांना पुढील चौकशीसाठी हजर राहण्याचे समजपत्र दिले आहे.



## नाशिक विधानपरिषदेच्या जागेवरून भाजपमध्ये संघर्ष!

प्रतिनिधी २९ मे

**नाशिक :** विधानपरिषदेच्या जागेवरून एकीकडे महायुतीत भाजप आणि शिवसेनेत जागावाटपाची रस्सीखेच सुरू असतानाच, आता भाजपमध्ये अंतर्गत चुरस प्रचंड वाढल्याचे चित्र समोर आले आहे. भाजपचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे मंत्री गिरीश महाजन यांचेच दोन अत्यंत निकटवर्तीय आणि खंदे समर्थक या जागेसाठी थेट आमनेसामने ठाकले आहेत.

# शिष्टमंडळ उद्या अंतरवालीत !


प्रतिनिधी २९ मे

**मुंबई:** राज्यातील सर्व मराठ्यांना आरक्षण देण्यात यावे यासाठी आतापर्यंत अनेक वेळा आमरण उपोषण करणारे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी ३० मेपासून मराठवाड्यातल्या रणरणत्या उन्हात पुन्हा आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी शनिवारपासून अंतरवाली सराटीत उपोषणाचा दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याशी चर्चा करण्याकरिता सरकारच्यावतीने शिष्टमंडळ त्यांच्या गावात जाणार आहे.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली उद्योग मंत्री उदय सामंत, शिवसेना शिंदे पक्षात नव्याने प्रवेश केलेले आमदार बच्चू कडू आणि भाजपचे आमदार प्रसाद लाड जरांगे पाटील यांची त्यांच्या गावात भेट घेऊन समजूत काढणार आहेत.

# अकोलेकरांना हसवण्यासाठी सज्ज !

## शनिवारी प्रणीत मोरे यांची 'द बिगेस्ट कॉमेडी नाईट'



प्रतिनिधी २९ मे

**अकोला:** अकोला शहरातील रसिक आणि विनोदप्रेमी नागरिकांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि उत्साहाची बातमी आहे. सोशल मीडिया आणि स्टँड-अप कॉमेडीच्या विश्वात आपल्या अनोख्या शैलीने अवघ्या महाराष्ट्राला भुरळ घालणारा प्रसिद्ध कॉमेडियन प्रणीत मोरे हे पहिल्यांदाच अकोल्यात लाईव्ह परफॉर्मन्स देण्यासाठी येत आहे. शनिवार ३० मे रोजी शहरातील प्रतिष्ठित 'द हेरिटेज' येथे हा धमाकेदार विनोदी सोहळा पार पडणार आहे.

अकोल्यात आतापर्यंतचा सर्वात मोठा विनोदी शो 'द बिगेस्ट कॉमेडी नाईट विथ प्रणीत मोरे' या नावाने आयोजित करण्यात आला आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा शेवट आणि दैनंदिन धावपळीतून विरंगुळा म्हणून अकोलेकरांना खळखळून हसवण्यासाठी या लाईव्ह शोचे आयोजन करण्यात आले आहे. प्रणीत मोरे यांच्या हजरजबाबी आणि धमाल पंचलाईन्सचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची सुवर्णसंधी अकोल्यातील तरुणाईला आणि कुटुंबांना मिळणार आहे. अकोल्यात पहिल्यांदाच एवढा मोठा स्टँड-अप कॉमेडीचा लाईव्ह शो होत असल्याने शहरातील सांस्कृतिक वर्तुळात आणि तरुणांमध्ये या कार्यक्रमाबाबत प्रचंड उत्सुकता पाहायला मिळत आहे.

# तुकाराम मुंढे अकोल्यात येतील काय?

## दूध व गुटखा माफियांवर वचक निर्माण करतील काय



प्रतिनिधी २९ मे

**अकोला :** आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी प्रसिद्ध असलेले सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्त पदाचा कारभार हाती घेताच पुन्हा एकदा आपला इम्पॅक्ट दाखवून दिला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या तीन दिवसांतच मुंढे थेट 'ॲक्शन मोड' मध्ये आले असून त्यांनी राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाची एक विशेष धडक मोहीम सुरू केली आहे. राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अनधिकृत आणि बेकायदेशीर आस्थापनांना कडक इशारा देत प्रशासनाने मुंबई, पुणे आणि नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो रुपयांचा भेसळयुक्त साठा जप्त केला आहे. अकोल्यातील गुटखा माफिया व अन्न व औषध प्रशासनातील ढिसाळ कारभाराची दखल घेण्यासाठी तुकाराम मुंढे अकोल्यात येतील काय अशी विचारणा होत आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे नवे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी नुकताच २५ मे रोजी आपला नवीन कार्यभार स्वीकारला. पदभार हाती घेताच त्यांनी राज्यातील जनतेच्या आरोग्याला प्राधान्य देत सर्व विभागांतील अधिकाऱ्यांना तातडीने धाडी व जप्तीची विशेष मोहीम राबविण्याबाबत कडक निर्देश दिले होते. आयुक्तांच्या या आदेशानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या यंत्रणेने कमालीची तत्परता दाखवली.

मुंढे यांच्या निर्देशानुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी राज्यातील विविध संशयास्पद भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकले. यामध्ये प्रामुख्याने गुटखा, पानमसाला व तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या प्रकरणी एकूण ५३ आस्थापनांची कसून तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३४ ठिकाणी बंदी असलेला गुटखा आणि पानमसाल्याची सर्रास विक्री होत असल्याचे रंगेहात आढळून आले.

### अकोल्यातील दूधाची करतील काय तपासणी

गुटखा आणि पानमसाल्याव्यतिरिक्त, अन्न व औषध प्रशासनाच्या विविध विभागांतील अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने बनावट दूधाची होत असलेली विक्री पाहता ती रोखण्यासाठी तुकाराम मुंढे यांनी अकोल्यात येण्याची गरज व्यक्त केली जात आहे. नागरिकांच्या दैनंदिन खाण्यापिण्याशी संबंधित असलेल्या पॅकबंद पिण्याचे पाणी, दूध, नुडल्स, कार्बोनेटेड वॉटर, खाद्यतेल, स्वीट व फरसाण, आईसक्रीम, डिंक, मसाले, खवा, पनीर, तूप, बेसन व बेकरी पदार्थांच्या शुद्धतेची तपासणी करण्याची मागणी होत आहे.

# नीट परीक्षेसाठी आता वायूसेनेची घेणार मदत!

वृत्तसंस्था २९ मे

**नवी दिल्ली :** नीट-युजी परीक्षेतील पेपर लीक प्रकरण आणि झालेल्या गोंधळानंतर आता केंद्र सरकार आगामी पुनर्परीक्षा पूर्णपणे सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी एक अत्यंत मोठा पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. २१ जून रोजी होणाऱ्या या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका प्रिंटिंग प्रेसपासून ते देशभरातील परीक्षा केंद्रांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी थेट 'भारतीय वायुसेनेची' मदत घेण्याबाबत गंभीर विचार सुरू आहे.

या संदर्भात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या निवासस्थानी एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीला शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, राष्ट्रीय परीक्षा संस्थेचे महासंचालक अभिषेक सिंह आणि संरक्षण मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सध्याच्या व्यवस्थेनुसार परीक्षेच्या प्रश्नपत्रिका एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्यासाठी टपाल विभागाच्या यंत्रणेचा वापर केला जातो. यामध्ये अनेक स्तरांवर मानवी हस्तक्षेप होत असल्याने गोपनीयता भंग होण्याचा आणि पेपर लीक होण्याचा धोका जास्त असतो.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने तयार केलेल्या नवीन प्रस्तावानुसार आता भारतीय हवाईदल प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीची जबाबदारी सांभाळू शकते. वायुसेनेच्या विमानांचा आणि त्यांच्या कडक सुरक्षा प्रोटोकॉलचा वापर करून प्रश्नपत्रिका थेट आणि सुरक्षितपणे वितरित केल्या जातील, जेणेकरून कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला जागा उरणार नाही. या प्रस्तावावर अंतिम निर्णय पंतप्रधान कार्यालयाच्या मंजुरीनंतर घेतला जाईल.




# पुण्यात विषारी दारूमुळे १३ जणांचे बळी!

## मुख्यमंत्र्यांचे कडक कारवाईचे निर्देश



प्रतिनिधी २९ मे

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू प्राशन केल्याने आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे, तर अनेकांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. पिंपरी-चिंचवडमधील दापोडी आणि फुगेवाडी भागात मिळून आठ जणांचा मृत्यू झाला असून, पुण्यातील काळेपडळ भागात तीन तर हडपसर भागात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. ही विषारी स्पिरिटयुक्त दारू योगेश वानखेडे याने तयार केली होती. ही दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विविध भागांमध्ये विकली गेल्याचे समोर आले आहे. दापोडी, फुगेवाडी, हडपसर आणि काळेपडळ परिसरातील दारू प्राशन केलेल्या काही जणांचा तोंडाला फेस येऊन मृत्यू झाल्याची माहिती आहे. योगेश वानखेडे हा दारू विक्रेता असून, यापूर्वीही त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी पोलिसांनी त्याच्यासह आठ जणांना आतापर्यंत अटक केली आहे. आता या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर भाष्य केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात माझं पुणे पोलीस आयुक्तांशी बोलणं झालेलं आहे. कुठल्या ठिकाणी विषारी दारू तयार झाली हे पोलिसांनी शोधून काढलेले आहे. याच्या पाठीमागे जे काही लोक आहेत, त्यांना अटक करण्यात आलेली आहे. आणखी काही लोक यात असू शकतात. ते शोधण्याचे काम सध्या सुरू आहे. ज्यांची प्रकृती गंभीर आहे त्यांना उपचार करून वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही घटना अत्यंत गंभीर आहे. ज्या ठिकाणी हे सगळं तयार झालं त्याच्या पाठीमागे कोण-कोण आहेत हे पोलीस शोधून काढत आहेत. आतापर्यंत आठ लोकांना अटक झाली आहे. अजून काही लोकांना अटक होऊ शकते. या प्रकरणातील संपूर्ण साखळी शोधून त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल.

कारण ही एक प्रकारे हत्याच आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शुक्रवार, दि. २९ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## तीन मित्रांनी जपले भावबंध

**हिवरखेड :** आजचा काळ खूप व्यवहारिक झाला आहे. आपला फायदा आधी पाहिला जातो परंतु निखळ मैत्री आजही जपली जाते. सुख दु:खात एकमेकांची साथ दिली जाते. मैत्रीचा भावबंध जपला जातो. हिवरखेड येथे सोनाळा मार्गावरील पेट्रोलपंपाच्या बाजूला असलेल्या हॉटेल महालक्ष्मी येथे तीन मित्रांनी आपल्या लग्नाचा वाढदिवस एकत्रित साजरा केला. या निमित्ताने त्यांची जुनी मैत्री कायम रहावी हाच उद्देश होता. संदीप खिरोडकार, गणेश राठोड, उमेश



माहुरे या तीन दांमपत्याचा त्यांच्या मित्र परिवाराच्या उपस्थितीत जल्लोषात लग्नाचा वाढदिवस पार पडला. परिसरात आयोजनाची चर्चा झाली.

# साहस, धैर्य आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश !



### आज आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट दिन

आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट दिन हा साहस, धैर्य आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देतो. हा दिवस माउंट एव्हरेस्टच्या ऐतिहासिक चढाईच्या स्मरणासह पर्वतारोहणातील मानवी यश आणि हिमालयाचे संरक्षण यावर प्रकाश टाकतो. भारताने या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत पर्वतारोहकांनी देशाचा गौरव वाढवला आहे. हा दिवस पर्यावरण जागरूकता आणि साहसी भावनेचा उत्सव आहे.

आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट दिन दरवर्षी २९ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगातील सर्वोच्च शिखर, माउंट एव्हरेस्ट (८,८४८.८६ मीटर) यशस्वीपणे सर करणाऱ्या पहिल्या पर्वतारोहकांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. २९ मे १९५३ रोजी न्यूझीलंडचे पर्वतारोहक सर एडमंड हिलरी आणि नेपाळी शेर्पा तेन्झिंग नोर्गे यांनी प्रथमच एव्हरेस्टच्या शिखरावर यशस्वी चढाई केली. या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. यामुळे पर्वतारोहणाच्या क्षेत्रात प्रेरणा मिळते आणि पर्यावरण संरक्षण, साहस आणि मानवी धैर्य यांचे महत्त्व अधोरेखित होते.

सर एडमंड हिलरी आणि तेंझिंग नोर्गे यांनी २९ मे १९५३ रोजी सकाळी ११:३० वाजता माउंट एव्हरेस्टच्या शिखरावर पाऊल ठेवले. ही चढाई ब्रिटिश मोहिमेचा भाग होती, ज्याचे नेतृत्व कर्नल जॉन हंट यांनी केले होते. या यशस्वी चढाईनंतर माउंट एव्हरेस्ट पर्वतारोहणाचे प्रतीक बनले. २००८ मध्ये नेपाळ सरकारने २९ मे हा आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट दिन म्हणून घोषित केला. हा दिवस केवळ हिलरी आणि तेंझिंग यांच्या कामगिरीचेच स्मरण करत नाही, तर पर्वतारोहणातील शेर्पा समुदायाच्या योगदानालाही मानवंदना देतो.

एव्हरेस्ट दिन मानवी धैर्य, चिकाटी आणि साहस यांचे प्रतीक आहे. हे पर्वतारोहकांना आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरित करते. हिमालयातील पर्यावरणीय संवेदनशीलता आणि प्रदूषणाच्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवणे. नेपाळ आणि भारतासारख्या देशांमध्ये हिमालय हा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा आहे. हा दिवस स्थानिक समुदायांच्या योगदानाला मान देतो. हा दिवस नेपाळच्या पर्यटनाला चालना देतो, कारण माउंट एव्हरेस्ट हा जागतिक पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे.

नेपाळमध्ये हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. काठमांडू आणि एव्हरेस्ट बेस कॅम्प येथे पर्वतारोहणाशी संबंधित कार्यक्रम, परेड आणि सांस्कृतिक सोहळे आयोजित केले जातात. पर्वतारोहक या दिवशी विशेष मोहिमांचे आयोजन करतात आणि एव्हरेस्टवरील यशस्वी चढाईंच्या स्मृती जागवतात. हिमालयातील कचरा साफसफाई मोहिमा, वृक्षारोपण आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित केले जातात. पर्वतारोहणात योगदान देणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार दिले जातात, विशेषतः शेर्पा समुदायाला. शाळा, महाविद्यालये आणि संस्थांमध्ये पर्वतारोहण आणि पर्यावरण संरक्षण यावर व्याख्याने आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

### आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट दिन उद्देश

**प्रेरणा देणे :** तरुण पिढीला साहस, धैर्य आणि चिकाटी यांचे महत्त्व समजावणे.

**पर्यावरण संरक्षण :** हिमालयातील जैवविविधता आणि पर्यावरण रक्षणासाठी जागरूकता वाढवणे.

**शेर्पा समुदायाला मान :** शेर्पा मार्गदर्शकांच्या योगदानाला मान्यता देणे, जे पर्वतारोहणात महत्त्वाची भूमिका बजावतात.

**पर्यटनाला चालना :** नेपाळ आणि हिमालय क्षेत्रातील पर्यटनाला प्रोत्साहन देणे.

**सुरक्षितता :** पर्वतारोहणातील सुरक्षित पद्धती आणि नियमांचे पालन करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

### एव्हरेस्टशी संबंधित काही आश्चर्यकारक तथ्ये

एव्हरेस्टचा शोध सर्वप्रथम भारतीय सर्वेक्षक आणि गणितज्ञ राधानाथ सिकदर यांनी लावला होता. एव्हरेस्टवर चढाई करण्यासाठी वसंत ऋतू आणि शरद ऋतू हा सर्वात लोकप्रिय काळ मानला जातो. एव्हरेस्टवरील किमान तापमान उणे ४० अंशांपर्यंत पोहोचते. दरवर्षी ८०० लोक हिमालयावर चढाई करण्याचा प्रयत्न करतात. आतापर्यंत हिमालयावर चढाई करताना सुमारे ३०० लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेकांनी एव्हरेस्टवर चढाई करण्याचा विक्रम केला आहे. नेपाळच्या अप्पा शेर्पा यांनी २१ वेळा एव्हरेस्टवर चढाई करण्याचा विक्रम केला आहे. हरियाणाचे विकास कौशिक आणि त्यांची पत्नी सुषमा कौशिक हे एव्हरेस्टवर चढाई करणारे सर्वात तरुण जोडपे आहेत. ४५ वर्षीय प्रेमलता अग्रवाल एव्हरेस्ट शिखरावर चढाई करणारी सर्वात वयस्कर महिला ठरली आहेत.

............

### माउंट एव्हरेस्टवर चढणारी भारतातील पहिली महिला गिर्यारोहक

१९८४ मध्ये भारताची पहिली महिला गिर्यारोहक बचेंद्री पाल हिने एव्हरेस्ट शिखर जिंकण्यात यश मिळवले. १९८४ मध्ये भारताने एव्हरेस्टवर चढाई करण्यासाठी एक संघ तयार केला. या संघात १६ जण होते. त्यात ११ पुरुष गिर्यारोहक आणि ५ महिला गिर्यारोहक होत्या. कठीण चढाई आणि वादळाचा पराभव केल्यानंतर, बचेंद्री पाल माउंट एव्हरेस्टवर पोहोचणारी पहिली महिला ठरली. बचेंद्री पाल यांना त्यांच्या साहसासाठी अर्जुन पुरस्कार, पद्मश्री पुरस्कार, माउंटेनियरिंग फाउंडेशनकडून सुवर्णपदक आणि उत्तर प्रदेश सरकारकडून सुवर्णपदक मिळाले आहे.

................

### चोंजिन अंगमो माउंट एव्हरेस्ट सर करणारी भारतातील पहिली अंध महिला

अलीकडेच किन्नौरच्या चोंझिन अँग्मो यांनी एव्हरेस्टवर चढाई करून इतिहास रचला आहे, असे करणारी ती पहिली भारतीय अंध महिला आहे. वयाच्या आठव्या वर्षी दृष्टी गमावल्यानंतरही, त्यांनी हार मानली नाही आणि सर्वात उंच पर्वतावर तिरंगा फडकवला.

### माउंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या पहिल्या भारतीय गिर्यारोहकांची माहिती

**१. पहिले भारतीय पुरुष :** कॅप्टन अवतार सिंग चीमा २० मे १९६५ रोजी त्यांनी हा पराक्रम केला.ते एव्हरेस्ट सर करणाऱ्या पहिल्या यशस्वी भारतीय लष्करी मोहिमेचे सदस्य होते.

**२. पहिल्या भारतीय महिला :** बचेंद्री पाल २३ मे १९८४ रोजी त्यांनी एव्हरेस्टवर पाऊल ठेवले. त्या एव्हरेस्ट शिखर सर करणाऱ्या पहिल्या भारतीय आणि जगातील पाचव्या महिला ठरल्या.

**३. सर्वात तरुण भारतीय :** राघव जुनेजा आणि मालावत पूर्णामालावत पूर्णा २०१४ मध्ये वयाच्या अवघ्या १३ वर्षे ११ महिने पूर्ण असताना तिने एव्हरेस्ट सर केला. ती जगातील सर्वात तरुण मुलगी ठरली. राघव जुनेजा २०१३ मध्ये वयाच्या १५ व्या वर्षी त्याने आपल्या शालेय मित्रांसह हा पराक्रम केला.

**४. इतर महत्त्वाचे विक्रम :** संतोष यादव या एव्हरेस्ट शिखर सलग दोन वेळा (१९९२ आणि १९९३ मध्ये) यशस्वीपणे सर करणाऱ्या जगातील पहिल्या महिला आहेत.

**पहिले दिव्यांग भारतीय :** अरुणिमा सिन्हा या कृत्रिम पायाच्या साहाय्याने २०१३ मध्ये एव्हरेस्ट सर करणाऱ्या जगातील पहिल्या महिला दिव्यांग गिर्यारोहक आहेत.


# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारकार्याचा एक शेवटचा रथ म्हणजे माईसाहेब

### डॉ. सविता भीमराव आंबेडकर स्मृतिदिन

डॉ. सविता भीमराव आंबेडकर (माईसाहेब) या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या द्वितीय पत्नी, एक कुशल डॉक्टर आणि सामाजिक कार्यकर्त्या होत्या. बाबासाहेबांच्या कठीण काळात त्यांनी त्यांची सावलीसारखी काळजी घेतली आणि त्यांच्या महान कार्यात मोलाचे योगदान दिले.

**नंतरचे आयुष्य आणि कार्य :**

६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर काही काळ त्या एकाकी राहिल्या. पुढे त्यांनी दलित आणि बौद्ध चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवला. १४ एप्रिल १९९० रोजी बाबासाहेबांना मरणोत्तर मिळालेला 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार त्यांनी तत्कालीन राष्ट्रपतींच्या हस्ते स्वीकारला. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर माईसाहेबाना अपमान आणि अवहेलनेला सुध्दा समोर जावं लागले होते. पुढे १९७२ पर्यंत माई दिल्लीतील नेहरोली भागात एकाकी जीवन जगात होत्या. त्यानंतर दलित पॅन्थर च्या चळवळीत राजा ढाले यांनी त्यांना मुंबईत आणले. दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी माईंचा सन्मान व आदर सत्कार केला. दलित पँथर तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या सदस्य व कार्यकर्त्यांच्या आग्रहाने माईसाहेब दलित चळवळीच्या मुख्य प्रवाहात येऊ लागल्या होत्या. 'रिडल्स इन हिंदूझम' च्या आंदोलनात त्यांनी महत्त्वाची भूमिका घेतली होती. माईसाहेब या अतिशय हूशार व संवेदनशील होत्या. त्यांचं इंग्रजीवरही प्रभुत्व होतं. हे त्यांनी बाबासाहेबांच्या सहवासात कमवलं मोठं धन होतं. माईंनी 'डॉ.आंबेडकरांच्या सहवासात' हे बाबासाहेबांवर आधारित चरित्रपर पुस्तक लिहिले होते. त्यामध्ये त्यांनी बाबासाहेबांच्या प्रति असलेली प्रेमानुभतीचं वर्णन केलेलं आहे. त्याशिवाय हिंदू कोड बिलाच्या मसुद्याकरिता आवश्यक टिपणं आणि पाली शब्दकोशाकरिताही केलेली मदत अशा अनेक बाबी त्यांनी त्यात नमूद केलेल्या आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारकार्याचा एक शेवटचा रथ म्हणजे माईसाहेब आबेडकर आहेत. २९ मे २००३ रोजी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात वयाच्या ९४ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आंबेडकरी अनुयायी त्यांना आदराने 'माई' किंवा 'माईसाहेब' म्हणून संबोधतात.



**संदर्भ :** १) डॉ.आंबेडकरांच्या सहवासात - डॉ. सविता भीमराव आंबेडकर २) भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म.

प्रा. प्रज्ञानंद थोरात
मो. ९८२२६७४४८७

**प्रारंभिक जीवन आणि शिक्षण:**

डॉ. सविता भीमराव आंबेडकर (माईसाहेब) यांचा जन्म दादर, मुंबई येथे एका पुरोगामी आणि सुशिक्षित सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे माहेरचे नाव 'शारदा कबीर' होते.शिक्षण: त्यांनी मुंबईच्या नामांकित ग्रँट मेडिकल कॉलेजमधून १९३७ मध्ये एमबीबीएस (शँए) ही वैद्यकीय पदवी पूर्ण केली. त्यानंतर त्यांनी गुजरातमध्ये मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणूनही काम केले.

**डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विवाह :**

(डॉ .बाबासाहेब अनेक व्याधींनी ग्रस्त असताना, उपचारादरम्यान त्यांची व शारदा कबीर यांची भेट झाली. दोघांच्या विचारांत देवाणघेवाण झाली आणि बाबासाहेब त्यांच्या बुद्धिमत्तेने व सामाजिक जाणिवेने प्रभावित झाले. आजारपणामुळे बाबासाहेबांना नेहमीच उपचाराकरिता त्यांच्याकडे त्यांना यावे लागत होते. दरम्यान कालांतराने त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. १५ एप्रिल १९४८ रोजी नवी दिल्ली येथे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी विवाह केला. लग्नानंतर त्यांचे नाव सविता आंबेडकर झाले.

**सामाजिक कार्य आणि सहवास :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर समाजातील वंचितांच्या हक्कासाठी लढा दिला. पण त्यांचे कौटुंबिक जीवनही फार त्रासदायक होते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी रमाबाई आजारपण आणि शारीरिक वृद्धीमुळे मरण पावल्या. त्याआधी बाबासाहेबांनी त्यांची चार मुलेही गमावली होती. दरम्यानच्या काळामध्ये बाबासाहेबांची प्रकृती देखील खालावत चालली होती. बाबासाहेबांच्या प्रकृतीची अहोरात्र काळजी घेऊन त्यांनी बाबासाहेबांच्या आयुष्यात अतिरिक्त वर्षे जोडली, असे मानले जाते. पुढे समाज त्यांना 'माईसाहेब' या नावाने ओळखू लागला.

घटना निर्मिती मध्ये माईसाहेबांचा वाटा मोलाचा आहे. बाबासाहेब हे सतत व्यस्त असत. त्यांना आपल्या तब्येतीकडे लक्ष देता येत नसे. परंतु माईसाहेब बाबासाहेबांची पूर्ण काळजी घेत असतं. जर माईसाहेबांनी बाबासाहेबांची योग्य रित्या काळजी घेतली नसती तर कदाचित रमाईच्या मृत्यूनंतरचं बाबासाहेबांनी आपल्या कार्यातून विराम घेतला असता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत रमाई नंतर पुढे अधिक जगविण्याचे श्रेय त्यांनी सविता आंबेडकर अर्थात माईसाहेब यांना दिले आहे. त्यामुळे रमाई सोबतच माईसाहेब यांचं देखील बाबासाहेबांच्या जीवन कार्यात महत्त्वपूर्ण योगदान आहे.

# रील्स व्हायरल करण्याचा एक खास फॉर्म्युला !

इन्स्टाग्रामवर सध्या हिंदी, मराठी, तमिळ आणि पंजाबी यांसारख्या प्रादेशिक भाषांमध्ये रील्स बनवणाऱ्या क्रिएटर्सना युजर्सकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक स्वतःच्या मातृभाषेतील कंटेंटशी भावनिकदृष्ट्या लवकर जोडले जातात. त्यामुळे स्थानिक भाषेत व्हिडिओ तयार केल्यास जास्त व्ह्यूज, वेगाने फॉलोअर्स आणि कमाईच्या मोठ्या संधी क्रिएटर्सना अतिशय कमी वेळेत उपलब्ध होत असल्याचे समोर आले आहे.

तुम्हाला इन्स्टाग्रामवर व्हायरल व्हायचे असेल, तर इंग्रजी किंवा फॅन्सी भाषेऐवजी स्थानिक भाषेचा वापर करणे फायदेशीर ठरेल. सध्या सोशल मीडियावर 'आपल्यासारख्या' दिसणाऱ्या आणि स्वतःच्या बोलीभाषेत बोलणाऱ्या क्रिएटर्सचा दबदबा वाढत आहे. हाच नवीन व्हायरल फॉर्म्युला वापरून अनेक लहान शहरांमधील कलाकार डिजिटल विश्वात मोठी लोकप्रियता मिळवत असून चांगला नफा कमावत आहेत.

आज, बहुतेक नवीन निर्माते इन्स्टाग्रामवर रील बनवून व्हायरल होण्याच्या शर्यतीत इंग्रजीमध्ये कंटेंट तयार करतात. पण काही महिन्यांच्या अथक परिश्रमांनंतरही ते निराश झाले आहेत. हिंदी, मराठी, बंगाली, तमिळ, पंजाबी किंवा त्यांच्या स्थानिक भाषेत रील बनवणारे क्रिएटर्स वेगाने व्हायरल होत आहेत आणि लाखो फॉलोअर्स मिळवत आहेत.

जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या मातृभाषेतील व्हिडिओ पाहते तेव्हा त्याला आपल्याबद्दल अधिक जवळची जाणीव होते. तो ते लाईक करतो आणि कमेंट करतो, शेअर करतो आणि सेव्ह करतो. इंग्रजीमध्ये बनवलेले रील्स बहुतेक लोकांना दूरचे वाटतात.

इंग्रजीमध्ये लाखो क्रिएटर्स आहेत, परंतु हिंदी आणि प्रादेशिक भाषांमध्ये चांगले, खरे आणि मनोरंजक कंटेंट तयार करणारे लोक अजूनही कमी आहेत. म्हणूनच आपल्या व्हिडिओला लवकर जाहिरात मिळते.

### सोप्या टिप्स

तुमच्या बोलीत भाषेत बोला: हिंग्लिश, देसी शैली किंवा तुमच्या गावाची भाषा- तुम्ही रोज जसे बोलता तसेच बोला. बनावट इंग्रजीची गरज नाही.

**स्थानिक विषय निवडा :** आपले शहर, गाव, उत्सव, खाद्यपदार्थ, समस्या, विनोद किंवा दैनंदिन जीवनाबद्दल व्हिडिओ बनवा.

**हे सोपे ठेवा:** महागड्या कॅमेरे किंवा एडिटिंगची आवश्यकता नाही. चांगली लाईटिंग, स्वच्छ आवाज आणि मनापासून बोलणे पुरेसे आहे.

**ट्रेंडिंग ऑडिओ लोकल ट्विस्ट:** लोकप्रिय ऑडिओ घ्या परंतु त्यात आपली स्वतःची भाषा आणि शैली जोडा.

नियमित पोस्टिंग : आठवड्यातून ५-७ रील ठेवण्याचा प्रयत्न करा.

### उदाहरणे

इंग्रजीत १-२ हजार व्ह्यूज मिळणारे अनेक क्रिएटर्स आता हिंदीत किंवा त्यांच्या भाषेत बनवून दररोज १-१० लाख व्ह्यूज मिळवत आहेत. कारण लोकांना आता 'तुमच्यासारख्या' क्रिएटर्सना फॉलो करायचं आहे.

इंस्टाग्रामवर वेगाने वाढण्याचा आणि फॉलोअर्स तयार करण्याचा सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग म्हणजे आपल्या मूळ भाषेत मनापासून कंटेंट तयार करणे. इंग्रजी सोडून हिंदी किंवा आपली स्थानिक भाषा स्वीकारा. जेव्हा लोक तुम्हाला आपले मानतात तेव्हा फॉलोअर्स, व्ह्यूज आणि कमाई हे सर्व आपोआप वाढेल.

## पुढील ५ वर्षात पृथ्वी धगधगणार!

# जागतिक तापमान मोडीत काढणार सर्व रेकॉर्ड्स

मे महिना संपत आला तरीही पावसाचा पत्ता नाही, अशावेळीच जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाची समस्या खूपच गंभीर झाल्याची बातमी समोर येत आहे. पुढील पाच वर्षात, म्हणजेच २०२६ ते २०३० दरम्यान, जगाचे सरासरी तापमान ऐतिहासिक सर्वोच्च पातळीवर पोहोचणार असल्याचा गंभीर अंदाज वर्तवला जात आहे. संयुक्त राष्ट्रांची हवामान संस्था आणि ब्रिटनच्या मेट ऑफिसने गुरुवारी जारी केलेल्या एका संयुक्त अहवालात हा धोक्याचा इशारा दिला आहे. ज्यामुळे येत्या काळात जगात तीव्र नैसर्गिक समस्या निर्माण होणार असून, भारतावर याचे नेमके काय परिणाम होणार ते जाणून घेऊया.

ब्रिटनच्या हवामान कार्यालयाच्या मुख्य संशोधक मेलिसा सीब्रुक यांनी सांगितले आहे की, 'वातावरणातील उष्णता कमालीची वाढत असून, जागतिक सरासरी तापमान सातत्याने वाढत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. २०२६ ते २०३० दरम्यान वार्षिक जागतिक सरासरी तापमान वर्ष १८५० ते १९०० च्या तुलनेत १.३ ते १.९ अंश सेल्सियस दरम्यान पोहोचण्याचा अंदाज आहे. दरम्यान, २०१५ च्या ऐतिहासिक पॅरिस हवामान करारात, जागतिक तापमान वाढ १.५ अंश सेल्सिअसच्या मर्यादेत रोखण्याचा निर्णय घेतला होता. आता, हा करार यशस्वी होण्याची शक्यता कमी दिसत आहे. नवीन अहवालानुसार, येत्या पाच वर्षांत किमान एक वर्ष असे असेल जे इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष असेल आणि २०२४ च्या उष्ण तापमानाला मागे टाकेल. २०२४ मध्ये, पहिल्यांदाच जागतिक तापमान पूर्व-औद्योगिक काळापेक्षा १.५ अंश सेल्सिअस अधिक नोंदवले गेले होते.

### पृथ्वीवर भीषण उष्णता वाढेल

तज्ज्ञांच्या मते, १.५ अंशाची मर्यादा अस्थायी स्वरूपात पार होणे म्हणजे पॅरिस करार पूर्णपणे अपयशी ठरला असे नाही, कारण, पॅरिस कराराचा नियम असा आहे की तापमान वाढ झाली की नाही, हे केवळ एका वर्षाच्या तापमानावरून ठरवले जात नाही. त्यासाठी सलग २० वर्षांच्या सरासरी तापमानाचा हिशोब काढला जातो. त्यामुळे एखाद्या वर्षी तापमान वाढले, तरी सुधारणा करता येऊ शकते. पण जग या तापमान वाढीच्या धोक्याच्या रेषेच्या अगदी जवळ पोहोचला आहे. जग जितके या मर्यादेच्या जवळ जाईल, तितक्या जास्त वेळा पृथ्वीचे तापमान ही रेषा ओलांडून पुढे जाईल. म्हणजेच पृथ्वीवर भीषण उष्णता, पूर किंवा चक्रीवादळांचे प्रमाण वेगाने वाढेल.

............

### उष्णतेच्या लाटांसारख्या गंभीर समस्यांची शक्यता

या अहवालातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे, पुढील पाच वर्षात आर्क्टिक क्षेत्रातील हिवाळ्याचे तापमान जागतिक सरासरीपेक्षा साडेतीन पटीने अधिक वाढण्याचा अंदाज आहे. यामुळे येत्या काळात बॅरेंट्स समुद्र, बेरिंग समुद्र आणि ओखोत्स्क समुद्रातील बर्फ मार्च महिन्यातच वेगाने वितळू लागेल. आर्क्टिकमधील या अनपेक्षित तापमानवाढीमुळे जागतिक हवामान चक्र पूर्णपणे कोलमडेल. उत्तर गोलार्धातील देशांना ढगफुटी, पूर आणि उष्णतेच्या लाटांसारख्या गंभीर संकटांचा सामना करावा लागेल. ही संकटे अनेक पटीने वाढतील आणि जगावर याचे खूप मोठे परिणाम होतील.

### भारतावरही होणार गंभीर परिणाम

तसेच या जागतिक तापमानवाढीचा हा अहवाल भारतासाठी आणि संपूर्ण दक्षिण आशियासाठी देखील एक धोक्याची घंटा आहे. तापमान जरी आर्क्टिक भागात वेगाने वाढणार असले, तरी त्याचे थेट आणि गंभीर परिणाम भारतावरही होणार आहेत. यामुळे पुढील पाच वर्षांत भारतात उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटांचे प्रमाण वाढेल. विशेषतः उत्तर आणि मध्य भारतात उन्हाळ्यात तापमान ४८ अशं ते ५० अंशाच्या पार जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे मान्सूनचे चक्र पूर्णपणे कोलमडणार असून, देशात कधी तीव्र दुष्काळ तर कधी ढगफुटी आणि माहपुरासारखी परिस्थिती निर्माण होईल.

..................

### मुंबईसारख्या महानगरांना सर्वाधिक धोका

तसेच तापमानवाढीमुळे हिमालयातील हिमनद्या कमालीच्या वेगाने वितळू लागतील. परिणामी, सुरुवातीच्या काळात गंगा, यमुना आणि ब्रम्हपुत्रा या नद्याना विनाशकारी पूर येतील, ज्यामुळे उत्तर भारत आणि शेजारील बांगलादेशमध्ये मोठे जलसंकट येईल. मात्र, कालांतराने बर्फ संपल्यामुळे याच बारमाही नद्या कोरड्या पडण्याचा मोठा धोका आहे.

याशिवाय समुद्राचे तापमान आणि वितळणारे बर्फ यामुळे समुद्राची पातळी झपाट्याने वाढेल. भारताला मोठा समुद्रकिनारा लाभला असल्याने मुंबई, चेन्नई आणि कोलकाता यांसारख्या किनारपट्टीच्या महानगरांना याचा सर्वाधिक धोका असेल.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि.२९ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## हिवरखेड येथे भीषण आग; अग्निशमन देण्याची पत्रकारांची मागणी

**हिवरखेड :** येथे दि २९ मे च्या रोजी पहाटे दोन ते तीनच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने हिवरखेड येथील फत्तेपुरी ते जय मल्हार पुलादरम्यान उमेश फोपसे यांच्या गोदामाला आग लावून दिल्याची प्राथमिक माहिती ओम फोपसे यांनी दिली.

गजानन बंड सतीश इंगळे इत्यादींना रात्री आग लागल्याचे निदर्शनास घेत असताना ,तात्काळ अक्षय यांना कळविले.. गावकऱ्यांनी धाव घेऊन आग विझविण्यासाठी खूप प्रयत्न केले.. सदर आगीमध्ये गोदामा मध्ये ठेवलेले शेकडो कॅरेट भस्मसात झाले.

पूर्ण गोडाऊन जळून खाक झाले. बैल जोडी बांधली होती ती सुद्धा भाजली.. अग्निशमन दलाला फोन केल्यानंतर उडवा उडवी ची उत्तरे मिळाली आणि अग्निशमन दल पोहोचलेच नाही असा आरोप सुद्धा फोपसे यांनी केला आहे.. सदर आगीच्या घटनेची माहिती हिवरखेड पोलिसांना देण्यात आली आहे.

# जिल्ह्यात दोन ट्रॅक्टर अपघातात दोन शेतकऱ्यांचा मृत्यू

## ♦ हृद्रयद्रावक : टिटवण व बेलुरा गावात शोककळा; सोळंके परिवारावर काळाचा घाला !

प्रतिनिधी २९ मे

**अकोला :** जिल्ह्यात सध्या शेती कामांना वेग आला आहे. पावसाळा तोंडावर येऊन ठेपल्याने शेतकरी दिवसरात्र शेतात राबत आहे. यातच नैसर्गिक आपत्ती त्यांचा पिच्छा सोडत नसल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात सलग दोन दिवस दोन अपघातात दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. बार्शिटाकळी तालुक्यातील टिटवण व अकोट तालुक्यातील बेलुरा येथे शेतीचे काम करीत असताना ट्रॅक्टरच्या चाकाखाली दबून दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे.

**अकोट तालुक्यात शोककळा**

अकोट : शेतात फंटन मारत असताना ट्रॅक्टर खाली येऊन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना अकोट तालुक्यातील बेलुरा येथे घडली शेतीकाम सुरू असताना तरुण ट्रॅक्टर चालकाचा ट्रॅक्टरखाली येऊन जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना बुधवारी सायंकाळी घडली. या दुर्दैवी घटनेमुळे बेलुरा गावात शोककळा पसरली असून शेतकरी वर्गातून हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश रामदास सोळंके वय ३० असे मृत चालकाचे नाव आहे. सध्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतातील मशागतीची कामे वेगाने सुरू असून बुधवारी भर दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास गणेश हा गावातीलच रामा सोळंके यांच्या शेतात ट्रॅक्टरद्वारे फंटन मारण्याचे काम करत होता काम सुरू असतानाच अचानक त्याला चक्कर आली. त्यामुळे चालू ट्रॅक्टरवरील त्याचा तोल गेला आणि तो थेट मागील चाकाखाली पडला. ट्रॅक्टरचे चाक अंगावरून गेल्याने त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह अकोट ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलविला. या घटनेचा पुढील तपास अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.या अचानक घडलेल्या अपघातामुळे सोळंके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



**राठोड कुटुंबातील एकमेव कमावता आधार हरपला :** बार्शिटाकळी : तालुक्यातील टिटवण शेत शिवारात आज एक अत्यंत हृदयद्रावक आणि दुर्दैवी घटना घडली. शेतात पहाटी काढत असताना ट्रॅक्टरच्या चाकाखाली आल्याने जीवन मंगू राठोड (४७), रा. तिवसा यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे तिवसा आणि टिटवण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मृतक जीवन राठोड हे टिटवण येथील शेत शिवारात ट्रॅक्टरच्या साहाय्याने पहाटी काढण्याचे काम करत होते. दरम्यान, काम करत असताना अचानक ट्रॅक्टरची पंजी (नांगरणीचे अवजार) मातीत घट्ट फसली. फसवलेली पंजी काढण्याच्या प्रयत्नात असतानाच, जीवन यांचा अचानक तोल गेला आणि ते थेट ट्रॅक्टरच्या मोठ्या चाकाखाली आले. अपघात इतका भीषण होता की, चाकाखाली चिरडल्या गेल्याने त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि संबंधित यंत्रणेने तातडीने घटनास्थळावर धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासासाठी फॉरेन्सिक व्हॅनला (न्याय वैद्यक पथक) पाचारण करण्यात आले होते. बार्शिटाकळीचे ठाणेदार प्रवीण धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस पथकाकडून घटनास्थळाचा पंचनामा व पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. मृतक जीवन राठोड हे अत्यंत गरीब कुटुंबातील असून, तेच आपल्या घराचे एकमेव कमावते माध्यम होते. त्यांच्या अकाली आणि दुर्दैवी जाण्याने राठोड कुटुंबाचा मुख्य आधारच हिरावला गेला असून, त्यांच्यावर अवलंबून असलेल्या पत्नी आणि मुलाच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. शासन आणि प्रशासनाने या गरीब कुटुंबाची भीषण परिस्थिती लक्षात घेऊन, त्यांना तातडीने व शासकीय आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## भाजयुमोतर्फे अकोटमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात



प्रतिनिधी २९ मे

**अकोट :** भारतीय जनता युवा मोर्चा अकोट शहर मंडळाच्या वतीने गुरुवार, २८ मे रोजी 'कृती कार्यक्रम' अंतर्गत स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंती कार्यक्रमाचे आयोजन जगदंबा अकॅडमी येथे करण्यात आले. कार्यक्रमाला युवक व विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जगदंबा अकॅडमीचे संचालक निलेश घोरे हे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून उमेश पवार उपस्थित होते. यावेळी भाजप शहराध्यक्ष हरीश टावरी, भाजयुमो जिल्हाध्यक्ष योगेश गोतमारे, जगन्नाथ बोडखे, पंकज कोलखेडे, भाजयुमो अकोट शहराध्यक्ष मयूर नाठे, अभिषेक देंडव, पीयूष ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात योगेश गोतमारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील देशाच्या विकास प्रवासाचा उल्लेख करत सावरकरांचे विचार युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. उमेश पवार यांनी सावरकरांचे चरित्र, त्यांचे साहित्यिक व राष्ट्रभक्त व्यक्तिमत्त्व तसेच हिंदुत्व, सामाजिक समता आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात निलेश घोरे यांनी सावरकरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसंदर्भात मार्गदर्शन केले.

## मूर्तिजापूर तालुक्याला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले!

### घरांची पडझड, टिनपत्रे उडाले, शेतीपिकांचे मोठे नुकसान

प्रतिनिधी २९ मे

**मूर्तिजापूर :** एकीकडे जिल्हा उन्हामुळे होरपळत असताना मूर्तिजापूर तालुक्यात गुरुवारी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने अनेक गावांना अक्षरशः झोडपून काढले. अवकाळी पाऊस आणि तुफानी वादळामुळे अनेक घरांवरील टिनपत्रे उडून गेली असून शेतीपिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

तालुक्यातील रोहणा येथील आशाबाई त्र्यंबकराव वरघट यांच्या घराचे तब्बल ३० टिनपत्रे चक्रीवादळात उडून गेल्याने मोठे नुकसान झाले. घरात साठवून ठेवलेले तूर व हरभऱ्याचे अंदाजे ८० ते ९० कट्टे पावसाच्या पाण्यात भिजल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनिल शंकर कुराडे यांच्या घरावरील १९ टीनपत्रे उडून गेले. तसेच लक्ष्मीबाई वरघट व इंदुबाई वरघट यांच्या घराचे छप्पर उडाल्यामुळे कुटुंब उघड्यावर आले असून शासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. याचबरोबर तालुक्यातील अनेक भागांत शेतीपिकांनाही फटका बसला आहे. वादळी वाऱ्यामुळे भाजीपाला पिके जमीनदोस्त झाली असून फळबागांचेही नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वीजपुरवठाही काही काळ विस्कळीत झाला होता. शेतकऱ्यांच्या हाती तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अचानक आलेल्या अवकाळी पाऊस व वादळामुळे प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नागरिक व शेतकऱ्यांकडून होत आहे.

**उकाड्यापासून तालुकावासीयांना दिलासा**

गुरूवारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे नुकसान झाले असले तरी उष्णतेच्या लाटेपासून दिलासा मिळाला आहे. नवतपाच्या काळात तालुकावासी उकाड्याने हैराण झाले होते. सतत अंगातून घामाच्या धारा वाहत असल्याने त्रस्त नागरिकांना या पावसाने दिलासा मिळाला असून, लवकरच पावसाला सुरुवात होण्याचा संकेतही दिला आहे.

**शेतकरी वर्ग लागला शेती मशागतीच्या कामाला**

गुरूवारी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी आता मरगळ झटकली असून, ते मोठ्या जोमाने कामाला लागले आहेत.

हा लवकर पाऊस येण्याचे संकेत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

सध्या शेतात नांगरटी, काळया, कचरा वेचणे सुरू आहे. मात्र तडपत्या उन्हामुळे त्यात व्यत्यय येत आहे.

## पंपावर मोटरसायकलचा धक्का लागताच तरुणाला चापटा बुक्क्यांनी मारहाण



प्रतिनिधी २९ मे

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अडगाव बु पेट्रोल पंपावर ग्राहक पेट्रोल भरत असताना मागील मोटरसायकलचा समोरील मोटरसायकलला थोडासा धक्का लागताच समोरील मोटरसायकल स्वार खाली उतरून मागील तरुणाला चापटा, बुक्क्यांनी मारहाण करतो, सदर ही घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून याबाबत फिर्यादी गौरव एकनाथ वाघोडे रा खंडाळा यांच्या फिर्यादी जबानी तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी शेख शागिर, शेख खालीक, विरुद्ध गुन्हा दाखल केला ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली, असून याबाबत हिवरखेड पोलिस तपास करीत आहेत.

■ सदर घटना सीसीटीव्हीमध्ये झाली कैद
■ अडगावच्या पेट्रोल पंपावर झाला हा वाद

# नाती जोडणारा अकोलीचा अनोखा सोहळा

### १४५ लाडक्या लेकींचे औक्षण अन् जावयांचे शाही स्वागत !



**अकोट :** संत गजानन महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेली अकोली जहागीरची भूमी... निमित्त होते अधिक मासाचे (धोंड्याचा महिना) आणि वातावरण होते दिवाळीसारख्या मोठ्या उत्सवाचे ! सासरी गेलेल्या आपल्या काळजाच्या तुकड्यांना, म्हणजेच लाडक्या लेकींना आणि जावबांना माहेरी बोलावून त्यांचा सन्मान करण्यासाठी संपूर्ण गावाने एक अनोखा आणि कौटुंबिक सोहळा अनुभवला. अकोली जहागीर येथील तीर्थभूमीवर तब्बल १४५ लेकींचा सन्मान आणि जावायांचे शाही स्वागत एकाच छताखाली सामूहिकरीत्या करण्यात आले. माहेर आणि सासरच्या नात्यातील ओलावा वाढवणारा हा सोहळा प्रत्येकाच्या डोळ्यात आनंदाश्रू आणि चेहऱ्यावर समाधान आणणारा ठरला.

गुरुवारच्या वारीचे औचित्य साधून अकोलीतील भाविकांनी आणि ग्रामस्थांनी या सामूहिक सोहळ्याचे नियोजन केले होते. सोहळ्याची सुरुवात अत्यंत भक्तीमय वातावरणात झाली. पहाटे ६ वाजता चि. अथर्व पवन जायले याने श्रींना अभिषेक घातला. त्यानंतर परंपरेप्रमाणे श्रींची महाआरती झाली आणि तीर्थक्षेत्राचा परिसर जयघोषाने दुमदुमून गेला. या धार्मिक विधीनंतर सुरू झाला तो मूळ कौटुंबिक सोहळा, ज्याची आतुरतेने संपूर्ण गाव वाट पाहत होते.आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात एकत्र कुटुंब पद्धती मागे पडत चालली आहे. अशा काळात हा अनोखा उपक्रम का राबवला, यामागची भावनिक भूमिका अनंत गावंडे यांनी मांडली. ते म्हणाले. अधिक महिन्यात विवाहित लेकीला माहेरी बोलावण्यामागे काही पारंपरिक आणि तितकीच भावनिक कारणे आहेत. सासरी गेलेल्या मुलीला माहेरी आणून तिचे आदरातिथ्य करणे आणि जावयाला वस्त्र-भेटवस्तू देऊन सत्कार करणे, ही आपली संस्कृती आहे. माहेर आणि सासर या दोन्ही बाजूंमध्ये आपुलकी व सुसंवाद वाढावा, याच सामाजिक उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.'हभप वासुदेवराव महल्ले महाराज यांनीही या उपक्रमाविषयी गौरवोद्गार काढले.

**औक्षण; भेटवस्तू अन् पाहुणचाराची पंगत**

कार्यक्रमात सर्वात आधी संत वासुदेव महाराज यांचे नात्याने जावई असलेले माधवराव सावरकर आणि सौ. पुष्पाताई सावरकर यांचा प्रथम नागरिक म्हणून सर्वोच्च सत्कार करण्यात आला. त्यानंतर गावातील ज्येष्ठ महिला - मृदुला गावंडे, हर्षा बोंद्रे, शिलाताई वालसिंगे, वैशाली तळोकार, मनीषा भगत, उषा तळोकार, मीना तळोकार, अनुराधा जायले, कल्याणी जायले आणि मयुरी जायले यांनी आलेल्या सर्व १४५ लेकींचे प्रेमाने औक्षण केले आणि त्यांना अधिक मासाचे 'वाण' व भेटवस्तू दिल्या. सर्व जावयांना सन्मानपूर्वक नारळ आणि दुप्पटा देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. माधवराव भांबुरकर, देवानंद डोबाळे, संतोषराव ताकतोडे यांच्यासह उपस्थित अनेक जावयांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

**या मान्यवरांची लाभली उपस्थिती**

या सोहळयाला संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे सहसचिव अवी गावंडे, विश्वस्त गजानन दुधाट, शरद वानखडे, पंजाबराव वालसिंगे, बंडू पाटील ठाकरे, मनोज बोंद्रे, पंकज जायले, प्रा. वाल्मीकराव भगत, बाळासाहेब जायले, उमेश जायले, भगवंतराव कराळे, अवी सावरकर आणि विजय जायले यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रविण भगत, पवन जायले, रामेश्वर जायले, बाबुराव जायले, सागर, प्रमोद, सतीश, नागेश, नंदूभाऊ इंगळे आदींनी परिश्रम घेतले.

## बार्शीटाकळीतील मशिदींमध्ये ईदची विशेष नमाज अदा



प्रतिनिधी २९ मे


**बार्शीटाकळी :** येथे मुस्लिम बांधवांनी ईदची नमाज अदा केली. बार्शीटाकळीतील मशिदींमध्ये नमाज अदा करण्यात आली. बार्शीटाकळीचे ठाणेदार धुमाळे यांनीही या प्रसंगी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. अत्यंत शांततापूर्ण वातावरणात बार्शीटाकळीत ईदचा सण साजरा झाला आहे.

त्याग आणि समर्पणाचे प्रतीक असलेला ईद-उल-अझा म्हणजेच बकरी ईदचा सण आज बार्शीटाकळी येथे अत्यंत धार्मिक आणि सलोख्याच्या वातावरणात साजरा झाला.

मुख्य ईदगाह मैदानावर शेकडो मुस्लिम बांधवांनी एकत्र येत ईदची विशेष नमाज अदा केली.या पवित्र प्रसंगी बार्शीटाकळीसह संपूर्ण महाराष्ट्रातून मक्केला गेलेल्या हज यात्रेकरूंची हज यात्रा सुखरूप आणि चांगल्या रितीने पार पडो, यासाठी सामूहिक दुवा म्हणजेच प्रार्थना करण्यात आली. नमाज संपन्न झाल्यानंतर बार्शीटाकळीमध्ये सर्वधर्मसमभावाचे अनोखे चित्र पाहायला मिळाले.

## वाशिम-अकोला मार्गावर अपघाताचा थरार!

### चिचखेड फाट्यावर चारचाकीचा चुराडा, चालक गंभीर जखमी



प्रतिनिधी २९ मे

**पातूर :** महामार्गावरील वाशिम-अकोला चिचखेड फाट्याजवळ झालेल्या अपघातात एका भरधाव चारचाकी वाहनाचा अक्षरशः चुराडा झाला असून, चालक गंभीररित्या जखमी झाला आहे. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती.

प्राप्त माहितीनुसार, वाशिम-अकोला मार्गावरून प्रवास करणाऱ्या एका चारचाकी वाहनाचा चिचखेड फाट्याजवळ चालकाचा ताबा सुटल्याने अपघात झाला. हा अपघात इतका भयानक होता की, धडकेमुळे चारचाकी वाहनाचा समोरील आणि बाजूचा भाग पूर्णपणे चेपला गेला. या अपघातात चारचाकीचा चालक गंभीर जखमी झाला आहे. अपघात घडताच स्थानिक नागरिकांनी आणि महामार्गावरून जाणाऱ्या इतर वाहनधारकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत चालकाला गाडीबाहेर काढले. जखमी चालकाला उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासनाने तातडीने घटनास्थळ गाठले. अपघातानंतर महामार्गाच्या मध्यभागी गाडीचा चक्काचूर झाल्यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहन बाजूला सारले आणि विस्कळीत झालेली वाहतूक पुन्हा सुरळीत केली. वळणावर वाशिम-अकोला महामार्गावर सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. चिचखेड फाट्यासारख्या धोकादायक वाहनधारकांनी वेगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. या अपघाताचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## मोफत गोमय श्री गणेशमूर्ती निर्माण प्रशिक्षण कार्यशाळा

प्रतिनिधी २९ मे

**अकोला :** विश्व हिंदू परिषद गोरक्षा आयाम गोमय मूल्यवर्धनच्या वतीने श्री भगवंतप्राप्ती गोसेवा धाम येथे सर्व वयोगटातील श्रीगणेश भक्त, गोभक्त,पर्यावरण प्रेमींसाठी गोमय गणेशमूर्ती निर्माण प्रशिक्षण देशी गाईच्या शेणापासून सुंदर व आकर्षक रंगरंगोटी सजावटी सह गणेशमूर्ती निर्माण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन ३१ मे रोजी,श्री गजानन महाराज मंदिर हॉल समता मयूर कॉलनी, संत तुकाराम चौक,अकोला येथे करण्यात आले आहे.

प्रशिक्षण कार्यशाळेत गो अनुसंधान केंद्र देवलापार नागपूर येथील तज्ज्ञांद्वारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक सहभागीला प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात येईल. प्रशिक्षणामध्ये सोप्यापद्धतीने गाईच्या शेणापासून साचा मोल्ड द्वारे गणेश मूर्ती निर्माणचे प्रशिक्षण देण्यात येईल. सर्व गणेश भक्तांनी यावर्षीपासून गोमय देशी गाईच्या शेणापासून बनवलेल्या स्वस्त व आकर्षक गणेश मूर्तीची स्थापना करावी. तरी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व पर्यावरण संरक्षण गो संरक्षण कार्यात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांद्वारे करण्यात आले. प्रवेश निश्चित करण्याकरिता ७७९८८७८९९ व्हाट्सअप नंबर वर मेसेज करावा.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
› इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
› इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
› शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
› अनुभवी शिक्षकवृंद
› सुसज्ज पायाभूत ईमारत
› दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
› सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
› आनंददायी शिक्षण पध्दती
› CCTV ची सुविधा
› कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
› सुसज्ज प्रयोगशाळा
पत्ता : मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २९ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# एनडीए सरकार मजबूत : ना.आठवले

## संविधानाच्या चौकटीत राहून वाद मिटविण्याचे आवाहन



प्रतिनिधी २९ मे

**यवतमाळ** : रिपब्लिकन पक्षाला विधान परिषदेवर भाजपाच्या कोट्यातून एक जागा द्यावी, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास आठवले यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात शब्द दिल्याचा दावा करत विधान परिषदेच्या निवडणुकीत संख्या बळानुसार रिपाइंला संधी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यवतमाळ येथे कालकथित रूपाताई नागसेन मानकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या लोकार्पणानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी सामाजिक सलोखा, संविधान, आरक्षण आणि राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य केले.

देशातील सर्व धर्मांचे सण-उत्सव शांततेत पार पडले पाहिजेत, असे सांगताना मुस्लिम समाजाच्या धार्मिक कार्यक्रमांनाही सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. बकरी ईददरम्यान काही किरकोळ वाद झाले असले तरी सामाजिक सौहार्द अबाधित असल्याचे त्यांनी नमूद केले. संविधानिक पदांवरील व्यक्तींनी वादग्रस्त वक्तव्ये टाळावीत, असे सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे मंत्री नितेश राणे यांच्यावर निशाणा साधला.

काँग्रेसने समाजात तेढ निर्माण केल्याचा आरोप करत दलितांवरील अत्याचार अद्याप थांबले नसल्याचे ते म्हणाले. मुस्लिम समाजालाही आर्थिक दुर्बल घटकांच्या (ईडब्ल्यूएस) आरक्षणाचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच लोकसंख्या नियंत्रणासाठी "हम दो, हमारे दो" या सूत्राचे पालन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

एससी प्रवर्गातील उपवर्गीकरणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर समिती स्थापन झाल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाच्या अभावामुळे काही समाजघटकांना आरक्षणाचा अपेक्षित लाभ मिळाला नसल्याची खंत व्यक्त करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे वंचित समाजाला दिशा मिळाल्याचे ते म्हणाले.

राहुल गांधी यांनी एनडीए सरकार वर्षभर टिकणार नसल्याचा केलेला दावा फेटाळून लावत "एनडीए सरकार मजबूत असून आपला कार्यकाळ पूर्ण करेल," असा विश्वास आठवले यांनी व्यक्त केला. पेट्रोल, डिझेल आणि गॅस दरवाढीसाठी आखाती देशांतील युद्धस्थिती कारणीभूत असल्याचे सांगत राज्य सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत असल्याचा दावा त्यांनी केला.

दरम्यान, डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन चिंताजनक असल्याचे नमूद करत अर्थतज्ज्ञांशी चर्चा होण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी 'यवतमाळची सामाजिक नाळ' ही कविता सादर केली.

पत्रकार परिषदेला दयाल बहादुरे, मोहन भोयर, सुधाकर तायडे, गोविंद मेश्राम, नवनीत महाजन, अश्वजित शेळके, राजन वाघमारे, बाळू घरडे आणि विजय आगलावे उपस्थित होते.

# भाजप नगरसेवक आक्रमक; कार्यालयीन कामकाजासह विधान परिषद निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा



प्रतिनिधी २९ मे

**उमरखेड** : नगरपरिषद प्रशासनाच्या कथित बेबंदशाही कारभाराविरोधात उमरखेड नगर परिषदेतील भाजपाच्या नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, कार्यालयीन कामकाजासह आगामी विधान परिषद निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात भाजपाच्या नऊ नगरसेवकांसह एका स्वीकृत सदस्याने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. भाजप गटनेते प्रशांत उर्फ विजय हरडपकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या निवेदनात नगरपरिषद प्रशासन नागरिकांच्या मूलभूत समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जानेवारी २०२६ पासून विविध प्रभागांतील नागरिकांच्या समस्या लेखी स्वरूपात नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांकडे मांडण्यात आल्या, मात्र त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नगरसेवकांनी नमूद केले.

विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून मांडण्यात येणाऱ्या प्रश्नांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असून लोकप्रतिनिधींच्या मागण्यांना केराची टोपली दाखवली जात असल्याची भावना नगरसेवकांनी व्यक्त केली. शहरातील अतिक्रमण, ओपन स्पेसवरील कथित बेकायदेशीर बांधकामे, विस्कळीत पाणीपुरवठा, आरोग्य विभागाची निष्क्रियता, पावसाळ्यापूर्वी नाल्यांची स्वच्छता न होणे, बंद पडलेले पथदिवे, मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव, गतिरोधकांची मागणी, रखडलेली निविदा कामे आणि नळ कनेक्शनमध्ये अतिरिक्त शुल्क आकारणी यांसारख्या विविध प्रश्नांकडे निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे.

तसेच अहिल्यादेवी गार्डनमधील झाडे पाण्याअभावी सुकत असल्याचा मुद्दा, मच्छीमार बांधवांसाठी सुरक्षित जागेची मागणी, ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था आणि व्यंकटेश नगरमधील नाली बांधकाम रखडल्याचा मुद्दाही नगरसेवकांनी उपस्थित केला आहे.

भाजप नगरसेवकांच्या मते, त्यांच्या प्रभागांतील विकासकामांना जाणीवपूर्वक दुय्यम वागणूक दिली जात असून प्रशासन पक्षपातीपणे काम करत आहे. त्यामुळे निषेध म्हणून नगरपरिषद कार्यालयावर कायमस्वरूपी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तक्रारींचे निराकरण न झाल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि विधान परिषद निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेवरही बहिष्कार टाकण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या भूमिकेमुळे तालुक्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून, ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप नगरसेवकांनी घेतलेल्या निर्णयाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

निवेदन देताना विजय हरडपकर, भास्कर साधू, करुणा कुबडे, गोपाल कलाने, वंदना घाडगे, सुरेंद्र कोडगिरवार, ज्योत्स्ना रुडे, खुशबू मेंढे, अमोल तिवरंगकर आणि स्वीकृत सदस्य विजय गुजरे उपस्थित होते.

# विजेच्या लपंडावामुळे नागरिक हैराण; ग्रामीण भागातील वीज यंत्रणेची दुरवस्था



प्रतिनिधी २९ मे

**उमरखेड** : तालुक्यात शहरासह ग्रामीण भागात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विज वितरण कंपनीच्या कथित मनमानी कारभारामुळे तसेच देखभाल-दुरुस्तीच्या अपुऱ्या कामांमुळे वीज यंत्रणेची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी विजेचे पोल वाकलेले, तारा लोंबकळलेल्या अवस्थेत असून रोहित्रांची देखभालही वेळेवर होत नसल्याचे चित्र आहे. परिणामी किरकोळ वारा किंवा पावसामुळेही वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मेंटेनन्सच्या नावाखाली केवळ थातूरमातूर कामे केली जात असून प्रत्यक्षात दुरुस्तीची कामे दर्जाहीन पद्धतीने होत आहेत. काही ठिकाणी मूळ परवानाधारक ठेकेदारांऐवजी इतरांकडून कामे करून घेतली जात असल्याची चर्चा असून याबाबत चौकशीची मागणी होत आहे.

तसेच सबस्टेशन स्तरावरील अभियंते आणि संबंधित अधिकारी प्रत्यक्ष कामांच्या ठिकाणी पाहणीसाठी जात नसल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील वीज यंत्रणेची दुरवस्था कायम असल्याचे दिसून येत आहे.

विशेषतः महागाव तालुक्यातील गुंज सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. शेतीपंप, घरगुती वीजपुरवठा तसेच व्यावसायिक व्यवहारांवर याचा परिणाम होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन वीज यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करावी, दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करावी आणि नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

# ३१ मे रोजी दुर्मिळ 'ब्ल्यू मून'चा योग; मात्र चंद्र निळा दिसणार नाही!

प्रतिनिधी २९ मे

**यवतमाळ** : येत्या रविवारी (दि. ३१ मे) आकाशात दुर्मिळ मानला जाणारा "ब्ल्यू मून" पाहण्याचा योग येणार आहे. मात्र, या दिवशी चंद्र प्रत्यक्षात निळ्या रंगाचा दिसणार नसल्याचे खगोल अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे.

मे महिन्यातील ही दुसरी पौर्णिमा असल्याने तिला "ब्ल्यू मून" असे संबोधले जाते. यापूर्वी १ मे रोजी पहिली पौर्णिमा झाली होती. खगोलशास्त्रानुसार दोन पौर्णिमांमध्ये साधारण २९ दिवस १२ तास ४४ मिनिटे ३८ सेकंदांचे अंतर असते. त्यामुळे एखाद्या महिन्याच्या सुरुवातीला पौर्णिमा आल्यास त्याच महिन्याच्या अखेरीस दुसरी पौर्णिमा येण्याची शक्यता असते. अशा दुसऱ्या पौर्णिमेला "ब्ल्यू मून" म्हटले जाते. "ब्ल्यू मून" या नावामुळे चंद्र निळसर दिसेल, असा अनेकांचा समज असतो. मात्र प्रत्यक्षात ३१ मे रोजी दिसणारा चंद्र इतर पौर्णिमेप्रमाणेच तेजस्वी व पांढरट स्वरूपात दिसणार आहे. पूर्वी हंगामातील तिसऱ्या पौर्णिमेला "ब्ल्यू मून" म्हटले जात असे. तसेच काही ठिकाणी एका वर्षातील १३व्या पौर्णिमेलाही हे नाव दिले जात होते. मात्र आता एका महिन्यातील दुसऱ्या पौर्णिमेला "ब्ल्यू मून" म्हणण्याची प्रथा अधिक प्रचलित झाली आहे. असा योग साधारणपणे दर ३० महिन्यांनी येतो. यापूर्वी ३० ऑगस्ट २०२३ रोजी ब्ल्यू मून दिसला होता. पुढील ब्ल्यू मून ३१ डिसेंबर २०२८ रोजी पाहायला मिळणार आहे. कधी-कधी एका वर्षात दोनदा ब्ल्यू मून येण्याचाही योग जुळतो. जानेवारीत ब्ल्यू मून आल्यास फेब्रुवारी महिन्यातील कमी दिवसांमुळे मार्चमध्ये पुन्हा दुसरा ब्ल्यू मून दिसू शकतो. असे चक्र साधारण १९ वर्षांनी पुन्हा घडते. ब्ल्यू मूनची सर्वात जुनी नोंद १५२८ सालातील असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, या खगोलीय घटनेभोवती विविध अंधश्रद्धा पसरवल्या जात असल्या तरी ब्ल्यू मून ही केवळ खगोलशास्त्रीय घटना असल्याने नागरिकांनी अफवा व अंधश्रद्धांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन खगोल अभ्यासकांनी केले आहे.

# तळणी येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महोत्सव



प्रतिनिधी २९ मे

**आर्णी** : तळणी येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर देवस्थानाचा वर्धापन दिन महोत्सव २३ मे ते २८ मे २०२६ दरम्यान भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सव काळात परिसरातील विविध भजनी मंडळांनी सुमधुर भजन सेवा सादर केली. तसेच होमहवन विधी पार पडला. सायंकाळी काढण्यात आलेल्या पालखी मिरवणुकीत ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. गुरुवार, दि. २८ मे रोजी ह.भ.प. अनंत महाराज राऊत यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. कीर्तनातून भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या महोत्सवात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थानचे कार्यकारी मंडळ, गावातील पुरुष मंडळ, महिला मंडळ तसेच बालगोपाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आनंदोत्सव साजरा केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शाहीद खान यांनी केले, तर आभार प्रदर्शन भास्कर पाटील बोक्षे यांनी मानले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थानचे पदाधिकारी व कार्यकर्ते, छावा मित्र मंडळ, स्व. वसंतराव नाईक युवा संघटना तसेच समस्त ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# घरकुल लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान द्या; नगरसेवक सैय्यद रियाज

प्रतिनिधी २९ मे

**आर्णी** : नगर परिषद आर्णी अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना प्रलंबित अनुदानाची रक्कम तात्काळ वितरित करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक सैय्यद रियाज सैय्यद वहाब



यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक गरीब व गरजू लाभार्थ्यांनी कर्ज काढून तसेच उसनवारी करून घरांचे बांधकाम सुरू केले आहे. काही लाभार्थ्यांनी बांधकाम पूर्ण केले असूनही त्यांना अद्यापपर्यंत अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे संबंधित कुटुंबांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही कुटुंबे अपूर्ण घरांमध्ये राहण्यास मजबूर असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. घरकुल योजनेतील प्रलंबित रक्कम तात्काळ वितरित करून लाभार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# समाजात सामाजिक सलोखा, ऐक्य व शांतता कायम राखा





प्रतिनिधी २९ मे

**पुसद** : पुसद शहरातील ईदगाह तसेच विविध मशिदींमध्ये ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त मोठ्या उत्साहात, भक्तिमय आणि धार्मिक वातावरणात ईदची नमाज अदा करण्यात आली.

सकाळपासूनच मुस्लिम बांधवांनी नवीन वस्त्र परिधान करून ईदगाह व मशिदींमध्ये मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

नमाजपूर्वी उलेमांनी ईद-उल-अजहाच्या पवित्रतेविषयी मार्गदर्शन करत बंधुभाव, शांतता, त्याग आणि मानवतेचा संदेश दिला. नमाजनंतर नागरिकांनी एकमेकांची भेट घेऊन "ईद मुबारक"च्या शुभेच्छांचा वर्षाव केला.

यावेळी ईदगाह येथे नमाजनंतर ॲडिशनल एसपी थोरात साहेब तसेच वसंत नगर पोलीस स्टेशनचे ठाणेदार दिनेश झामरे साहेब यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत समाजात सामाजिक सलोखा, ऐक्य व शांतता कायम राखण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी शहेरे काजी सदरोद्दीन साहेब, ईदगाह कमिटीचे अध्यक्ष गुड्डू भाई, सैय्यद इश्तियाक, मो. इरफान भाई, शेख कय्यूम भाई, सैय्यद समीर, डॉ. अर्सलान आदी मान्यवर उपस्थित होते.

शहरातील प्रमुख मशिदी तसेच ईदगाह परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ईदच्या निमित्ताने संपूर्ण शहरात आनंद, उत्साह आणि बंधुभावाचे वातावरण पाहायला मिळाले.

# वकिलांच्या परिषदेत कायदेशीर मदत व न्यायव्यवस्थेवर सखोल चर्चा




प्रतिनिधी २९ मे

**पुसद** : 'इनोसंट नेटवर्क'च्या वतीने पुसद येथील हॉटेल अतिथी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लॉयर्स मीट' परिषदेत निरपराध कैद्यांना कायदेशीर मदत, न्यायव्यवस्थेची सद्यस्थिती आणि वकिलांची सामाजिक जबाबदारी यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. विधी क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुराण पठण व त्याच्या मराठी अनुवादाने झाली. त्यानंतर कवी फैज अहमद फैज यांच्या प्रेरणादायी गीताचे सादरीकरण करण्यात आले.

प्रास्ताविकात ॲड. आदिल मिर्झा यांनी 'इनोसंट नेटवर्क'च्या कार्याची माहिती देत, शोषित आणि पीडित घटकांना वेळेवर कायदेशीर मदत मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. न्यायासाठी लढणाऱ्या व्यक्तींना सक्षम कायदेशीर पाठबळ देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

'सध्याची परिस्थिती आणि वकिलांची भूमिका' या विषयावर बोलताना मुंबईचे ॲड. शहजाद पठाण यांनी वकिली व्यवसाय केवळ उपजीविकेचे साधन नसून न्यायव्यवस्था आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी वकिलांनी संवेदनशीलतेने पुढे येण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रा. आकीब यांनी न्यायव्यवस्थेतील विद्यमान आव्हानांवर भाष्य करताना न्यायप्रक्रियेतील विलंब आणि सामाजिक विषमता यांसारख्या मुद्यांकडे लक्ष वेधले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आणि 'इनोसंट नेटवर्क'चे संस्थापक डॉ. वाहिद शेख यांनी 'निरपराध कैदी आणि वकिलांचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. तुरुंगात शिक्षा भोगणाऱ्या निरपराध व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक आणि संवेदनशील वकिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी २० कलमी कायदेशीर अजेंडा सादर करत वकिलांनी त्यावर गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन केले.

स्थानिक नागरिकांशी संवाद साधल्यानंतर अकोला आणि पुसद येथे 'इनोसंट नेटवर्क'च्या नवीन शाखा सुरू करण्यात आल्याची माहितीही डॉ. वाहिद शेख यांनी दिली.

# तळणीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



प्रतिनिधी २९ मे

**आर्णी** : शिक्षणाच्या माध्यमातून गावाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा प्रेरणादायी उपक्रम सामाजिक कार्यकर्ते सुनिलभाऊ पोतगंटवार यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला. शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या तळणी येथील विद्यार्थ्यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला.

तळणीसह यवतमाळ, आर्णी आदी ठिकाणी शिक्षण घेऊन गावाचा नावलौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून इतर विद्यार्थ्यांनाही शिक्षणासाठी प्रेरणा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सत्कार करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये दिव्या गजानन लोणकर, देविका अमोल हलबी, रिया राजेंद्र कांबळे, नम्रता सुभाष जाधव, प्रतीक्षा अरविंद बोक्षे, अल्फीया जलाल शेख, वैष्णवी महिंद्रा लांडगे, साक्षी प्रमोद कांबळे, नयन दिनेश पिंगळे, पूर्वा शंकर पेटकुळे, भारती प्रवीण जाधव, रोहिणी रोहिदास राठोड, प्रतीक प्रदीप भगत, ऋषिकेश रवी गायकवाड आणि देविका दीपक पिंगळे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहिद खान सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन निशांत हलबी यांनी मानले. कार्यक्रमाला गावातील मान्यवर, पालक, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावातील विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करून शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. २९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# वन्य जिव तसेच पाळीव प्राण्याकरिता पाणी पिण्याकरिता पशु प्याऊ

**अमरावती :** उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे वन्य जीव तसेच पाळीव प्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याची बाब लक्षात घेऊन आ.रवि राणा यांच्या हस्ते जंगल परिसरातील रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वन्य जीव व पाळीव प्राण्यांसाठी पशु प्याऊ समर्पित करण्यात आले. या उपक्रमामुळे उन्हाळ्याच्या कडक वातावरणात प्राण्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सदर उपक्रमांतर्गत जंगलालगतच्या मार्गांवर तसेच वन्य प्राण्यांची वर्दळ असलेल्या ठिकाणी पाण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या पशु प्याऊमध्ये सतत स्वच्छ पाणी उपलब्ध राहील याची काळजी घेण्यात येणार असून स्थानिक कार्यकर्त्यांना त्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यावेळी आ.रवि राणा यांनी सांगितले की, ‖उन्हाळ्यात मानवांसोबतच मुक्या प्राण्यांनाही मोठ्या संकटांचा सामना करावा लागतो.

# अमरावतीत पावसासह गारपीट

## ♦ अमरावतीत मान्सूनपूर्व पावसाची हजेरी

प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** अमरावतीत मान्सूनपूर्व पाऊस बरसला. काही ठिकाणी गारपीट सुद्धा झाली आहे. यामुळे नागरिकांना उकड्यापासून दिलासा मिळाला असला तरी गारपीट मुळे काही ठिकाणी नुकसान सुद्धा झाले आहे.

तब्बल महिनाभराच्या उकाड्याने नागरिकांच्या जीवाची लाहीलाही होत असताना आज अमरावती जिल्ह्यात पावसाने तात्पुरता दिलासा दिला.. सायंकाळी अमरावती शहर आणि जिल्ह्यात वादळीवारासह पावसाची हजेरी पाहायला मिळाली. हा मान्सून पूर्व पाऊस असल्याची माहिती आहे. ग्रामीण भागातील ब्राह्मणवाडा, सह रेवसा येथे गारपिटीसह पाऊस झाला. मागील महिना पासून अमरावती शहर जणू उष्णतेचा भट्टीत भाजून निघत होते. नागरिक या जीवघेण्या उकाड्यापासून त्रस्त झाले आहेत, कारण दिवसा रात्री गरम हवा चालत होत्या... त्यामुळे सुरू असलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आणि महिनाभरानंतर तात्पुरता दिलासा या पावसाने नागरिकांना मिळाला.



# निलेश परतानी याला जिवंत विहिरीबाहेर काढले

प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** आज दिनांक २९/०५/२०२६ रोजी सकाळी १०:५० वाजताच्या सुमारास अग्निशमन मुख्यालय येथे विद्यापीठ परिसरातील विहिरीमध्ये एक इसम पडल्याची तातडीची माहिती प्राप्त झाली. माहिती मिळताच अग्निशमन दलाने कोणताही वेळ न दवडता तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

या बचावकार्यात अग्निशमन केंद्र प्रमुख सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली फायरमन हर्षद दहातोंडे, फायरमन निलेश



काटपेलवार, फायरमन प्रणित पेठे तसेच वाहन चालक मो. फरहान यांनी सहभाग घेतला.

वाहन चालक मो. फरहान यांनी अत्यंत कौशल्याने व वेगाने वाहन चालवत अवघ्या ६ मिनिटांत घटनास्थळी पोहोचून तत्परतेचे उदाहरण निर्माण केले.

घटनास्थळी पोहोचताच अग्निशमन दलाने अत्यंत शिताफीने व धाडसाने रोप शिडीच्या साहाय्याने विहिरीमध्ये उतरून युवराज निलेश परतानी (वय २५ वर्षे) यास सुखरूप बाहेर काढले. या वेळी उपस्थित नागरिकांनी अग्निशमन दलाच्या धाडसी कार्याचे कौतुक केले.

अग्निशमन दल म्हणजे केवळ आग विझवणारे कर्मचारी नसून, संकटसमयी जीव वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालणारे खरे जीवनदाते आहेत, याची पुन्हा एकदा प्रचिती या घटनेतून आली.

अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे एक अमूल्य जीव वाचला असून नागरिकांकडून अग्निशमन दलावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर ४ दिवसात ८० गोवंश जप्त

## विरोध कराल तर सावधान थेट कारवाई होणार डॉ. बोन्द्रे यांनी दिली चेतवानी

प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** पश्चिम बहुल भागात पी आय उरलागोंडावार यांच्या बंदोबस्तात डॉ बोन्द्रे यांची कारवाई केली. कारवाई दरम्यान अडथळा निर्माण करू नका डॉ बोन्द्रे यांचे आवाहन केले.




बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलीस गुन्हे शाखा, सह मनपा पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने गेल्या चार दिवसापासून ठिकठिकाणी धाडसत्र राबविण्यात आलें. यात पश्चिम बहुल मुस्लिम परिसरात पोलिसांच्या बंदोबस्तात कत्तली साठी आणलेल्या ८० गोवंश जप्त करून जीवनदान देण्यात आलें... मनपा पशु वैद्यकीय अधिकारी डॉ सचिन बोन्द्रे यांनी गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, नागपुरी गेट पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार सह पोलीस ताफा बंदोबस्तात धाडसत्र राबविले. या दरम्यान काहींनी कारवाई दरम्यान अडचण निर्माण करण्याचा प्रयत्न केला असता डॉ सचिन बोन्द्रे यांनी कारवाई चा इशारा दिला.

वेळोवेळी नागरिकांना शासकीय कामात अडथळा निर्माण करू नका असे आवाहन करण्यात आलें. २७,मे रोजी अमरावती शहरातील पश्चिम बहुल भागात एस आर पी एफ पोलिसांचा एक प्लाटून बंदोबस्तात लावण्यात आला.

# रहाटगांव येथे होणार ५० खाटांचे जिल्हास्तरीय आयुष रुग्णालय

प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** जिल्ह्यातील गरजू व सर्वसामान्य घटकातील रुग्णांना आरोग्य संजीवनी मिळावी म्हंणून अमरावती मधील आरोग्य सेवांना अधिक बळकटी व विस्तार करण्याला घेऊन आ..सुलभा खोडके यांची सातत्यपूर्ण प्रयत्नांची मालिका सुरु आहे. शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे अत्याधुनिक प्रगत व सक्षम अशी आरोग्य यंत्रणा उभी झाली असतांना आता त्यामध्ये नवीन जिल्हा शासकीय आयुष रुग्णालयाची भर पडणार आहे. आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अमरावती येथे ५० खाटांच्या जिल्हास्तरीय आयुष रुग्णालयासाठी मौजा रहाटगांव येथील शेत सर्व्हे नं. १२१ एकुण क्षेत्र ९.५६ हे. आर पैकी १.२१ हे. आर जागा मंजूर करण्यात आली आहे.

## आ. सुलभा खोडके यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

केंद्र शासनामार्फत आयुष मंत्रालय कक्ष स्थापन करण्यात आले असुन त्याअनुषंगाने जिल्हास्तरावरील ग्रामीण भागात आयुर्वेदिक दवाखाने सुरु करण्यात आले आहेत. परंतु जिल्हास्तरावर आयुष रुग्णालयाची इमारत उपलब्ध नाही. त्यामुळे गरीब घटकांबरोबरच ग्रामीण व दुर्गम-अतिदुर्गम भागातील लोकांना आयुर्वेद चिकित्सा पद्धतीतून चांगली आरोग्य सेवा मिळावी, यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हास्तरावर आयुष रुग्णालयाची नितांत गरज असल्याने अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरु केला.



केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार जिल्हास्तरावर आयुष रुग्णालयाच्या इमारती करिता साधारणतः ३ ते ४ एकर जागा असणे आवश्यक आहे. जागा निश्चित न झाल्याने अमरावती येथे आयुष रुग्णालय स्थापन करण्याला घेऊन विलंब लागत होता.अशातच आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी जागेसंदर्भात शासन - प्रशासन स्तरावर पाठपुरावा चालू केला असता ,मौजे रहाटगांव येथे शेत सर्व्हे नं. १२१ एकुण क्षेत्र ९.५६ हे. आर पैकी १.२१ हे. आर जागा उपलब्ध असल्याने ती जागा जिल्हास्तर आयुष रुग्णालय अमरावती करिता निश्चित करण्याबाबत सूचना केली. महसूल विभागाच्या सर्व नियम व अटींनुसार जलद कामकाज करण्यात आल्याने आता अमरावती येथे ५० खाटांच्या जिल्हा आयुष रुग्णालयासाठी मौजे मौजा रहाटगांव येथे शेत सर्व्हे नं. १२१ एकुण क्षेत्र ९.५६ हे. आर पैकी १.२१ हे. आर जागा मंजूर करण्यात आली आहे.

अमरावती येथील ५० खाटांच्या जिल्हास्तरीय आयुष रुग्णालय सुरु करण्यासाठी त्याठिकाणी एकुण १,६७४.६२ स्के.मी. बांधकाम व आयुर्वेदीक वनस्पती करिता उद्यान साकारण्यात येणार आहे. तसेच पंचकर्म, क्षारसूत्र, उत्तरबस्ती. रक्तमोक्षण, अग्निकर्म, फिजिओथेरपी, प्रयोगशाळा इत्यादी सोयी सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या संदर्भात एक चांगला कृती आराखडा तयार करून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची सूचना आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय अमरावती यांना केली आहे.

# वनोजा बाग येथील घटना निंदनीय; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील वनोजा बाग येथे घडलेली ही घटना अत्यंत निंदनीय, संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या आणि आधीच समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या नाथजोगी भटक्या विमुक्त समाजातील गरीब कुटुंबांची घरे अशा प्रकारे जमीनदोस्त करणे हा अत्यंत गंभीर अन्याय आहे.

राहुलनाथजी, ’अकोला अमरावती युवा नाथ संघटना’ आणि सर्व सहकाऱ्यांनी एकत्र येऊन या अन्यायाविरोधात तात्काळ जे पाऊल उचलले आहे, ते अत्यंत कौतुकास्पद आहे. संकट काळात आपल्या समाजबांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आहे युवा नाथ संघटना अकोला व अमरावती पदाधिकारी उपस्थित होते. नाथ समाजातील अन्यायग्रस्त कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे भटक्या विमुक्त समाजावरील अन्यायाचा तीव्र निषेध केला. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील वनोजा बाग येथील नाथजोगी समाजाच्या कुटुंबांवर झालेल्या अन्यायाबाबत आणि दोषींवर कठोर कारवाई करणेबाबत जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील वनोजा बाग येथे अत्यंत धक्कादायक आणि अमानुष घटना घडली आहे.

# बकरी ईद रक्तदान सप्ताहाचे दुसरे वर्ष : तळपत्या उन्हात ३८ पेक्षा अधिक रक्तदात्यांचे रक्तदान

प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती व बडनेरा शाखेच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी बकरी ईद / ईद-उल-अजहा सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर बुधवार दि. २७ मे २०२६ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तपेढी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, अमरावती येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

‘मुक्या प्राण्यांची कुर्बानी न देता’ मानवतेसाठी रक्तदान करूया!’ हा सामाजिक संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिक, युवक व रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तळपत्या उन्हाची पर्वा न करता ३८ पेक्षा अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे अनोखे उदाहरण समाजासमोर ठेवले. अनेक युवकांनी प्रथमच रक्तदान करून मानवतेप्रती आपले कर्तव्य बजावले.बकरी ईद रक्तदान सप्ताहाचे हे दुसरे वर्ष असून, समाजात मानवता, बंधुता व सामाजिक सलोखा निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या शिबिराचे प्रमुख आकर्षण ठरले “One-Legged Woåer of Iåia” म्हणून देशभर ओळख असलेले एव्हरेस्टवीर अशोक मुन्ने यांची प्रेरणादायी उपस्थिती. कठीण परिस्थितीवर मात करून एव्हरेस्ट सर करणाऱ्या त्यांच्या जीवनप्रवासाने उपस्थित युवकांना जिद्द, संघर्ष आणि समाजसेवेची प्रेरणा दिली. विशेष म्हणजे रक्तदान शिबिराची सुरुवात स्वतः अशोक मुन्ने, वैभव भोंडे, सचिन खोब्रागडे व रेहमान शहा यांनी रक्तदान करून केली. त्यानंतर मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाला मा. डॉ. सतीश तराळ, प्रमोद कोळमकर (उपाध्यक्ष, महा. अंनिस अमरावती), मा. रजियाताई सुलताना (लेखिका व समाजसेविका), मा. अजय साखरे (अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती), सुभाष गौरखेडे, विजय डवरे (जिल्हा प्रधानसचिव, महा. अंनिस अमरावती), मो. अफसर भाई (जिल्हा कार्यवाह, बुवाबाजी विभाग अमरावती), रेहमान शहा (शाखाध्यक्ष, बडनेरा शाखा), वि. दा. पवार (उपाध्यक्ष, शहर शाखा अमरावती), हर्षा सगणे (अध्यक्ष, क्रांती नवनिर्मिती राष्ट्रीय संघटन), मा. विजया घोडेस्वार (बडनेरा शाखा कार्यवाह, संविधान जागर विभाग) तसेच मोनाली सदावर्ते (सर्पमित्र व प्राणीमित्र) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# राष्ट्रीय खत विक्री आराखड्यांतर्गत आयएफएमएस व ॲग्रीस्टॅक प्रणालीचे एकत्रीकरण

## खत विक्री प्रक्रियेत पारदर्शकता व सुलभता वाढणार

प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खत विक्री आराखडा (Nationaled Fertiliwer Sale Frameworke) प्रकल्पांतर्गत IFMS व AgriStack प्रणालीचे एकत्रीकरण करण्यात येत असून, खत विक्री प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, सुलभता व शेतकरी हित साध्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र शासनामार्फत “Fertili&wer Sale Application Systemed (FSAS)” हे मोबाईल आधारित ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना QR कोडद्वारे खतांचे ऑनलाईन बुकिंग करता येणार आहे. शेतकऱ्यांनी केलेले QR कोड आधारित बुकिंग तीन दिवसांसाठी वैध राहणार असून, संबंधित शेतकरी त्यांच्या सोयीनुसार निवडलेल्या खत विक्रेत्याकडे जाऊन खत खरेदी करू शकतील. अशी माहिती कृषी संचालक सुनील बोरकर यांनी एका पत्राद्वारे दिली आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी रांगेत उभे राहण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच, आवश्यक त्या खतांचे आगाऊ बुकिंग करता येणार असल्याने दुकानदारांकडून इतर अनावश्यक खतांची सक्ती होण्याची शक्यता कमी होणार आहे. परिणामी, खत विक्री प्रक्रियेत अधिक सुलभता व पारदर्शकता निर्माण होणार आहे.

सद्यस्थितीत विविध दुकानांमध्ये खतसाठा उपलब्ध आहे अथवा नाही, याबाबत शेतकऱ्यांना अचूक माहिती उपलब्ध होत नसल्याने त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास येत आहे. नव्या प्रणालीमुळे खत उपलब्धतेची माहिती वेळेवर मिळणार असल्याने शेतकऱ्यांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होणार आहे. या नव्या वितरण प्रणालीची केंद्र शासनाच्या तज्ज्ञ पथकाने पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील अष्टापूर येथे यशस्वी चाचणी केली आहे. तसेच, राज्यातील कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांची केंद्र शासनाने पथदर्शी प्रकल्पासाठी निवड केली असून, खरीप हंगामापासून “Fertili&wer Sale Application System” प्रणालीद्वारे खत विक्रीस प्रारंभ करण्यात येणार आहे.

# हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी

## ♦सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : ‘एक अमृत प्रवास’ या संकल्पनेवर नेत्रदीपक सोहळा ♦ दिग्गजांची राहणार उपस्थिती ♦ शिव परिवाराचे भव्य आयोजन’

प्रतिनिधी २९ मे

**अमरावती :** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या वैचारिक वारसाची जपवणूक करत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मूल्याधिष्ठित परंपरेत मोलाचे योगदान देणाऱ्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख तथा कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ‖सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : एक अमृत प्रवास‖ या संकल्पनेवर आधारित हा विशेष सोहळा रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आल्याची माहिती शिव परिवाराच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत घेण्यात येईल.

हॉटेल महफिल इन येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत शिव परिवाराच्या वतीने सांगण्यात आले की, शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहून हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या या दोन्ही व्यक्तिमत्त्वांचा प्रवास हा केवळ संस्थात्मक नेतृत्वाचा नसून सामाजिक बांधिलकी, संस्कार आणि सेवाभाव जपणाऱ्या कार्यसंस्कृतीचा आदर्श मानला जातो.




श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत समाजपरिवर्तनाची चळवळ उभी करण्यात या दोनही नेतृत्वाचा मोठा वाटा राहिला आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास देशातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मविभूषण खा. शरदचंद्रजी पवार राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषणजी गवई, केंद्रीय मंत्री ना. नितीनजी गडकरी, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री . ना. चंद्रशेखरजी बावनकुळे, राज्यमंत्री श्री.डॉ. पंकज भोयर तसेच अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंदजी तेजवानी उपस्थित राहणार आहेत. यासोबतच शिवाजी शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी गण यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

या सोहळ्यात हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात येणार असून अनेक मान्यवर त्यांच्याविषयी मनोगत व्यक्त करणार आहेत.

कार्यक्रमाच्या निमित्ताने अमरावती शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्याशी भावनिक नातेह असलेल्या अनेकांसाठी हा सोहळा म्हणजे कृतज्ञतेचा आणि प्रेरणेचा उत्सव ठरणार आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास संपूर्ण विदर्भ तसेच राज्यातून हजारो मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजनासाठी शिव परिवाराच्या वतीने शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य दिव्य असा स्टेज उभारण्यात येणार असून नागरिकांना कार्यक्रम बघता यावा यासाठी प्रत्येक ठिकाणी एलईडी स्क्रीन उभारण्यात येणार आहे. सोबतच हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबु इंगोले यांच्या जीवनावरील चित्रफीत देखील दाखविण्यात येणार आहे. नागरिकांची सुनियोजित बैठक व्यवस्था या प्रांगणात करण्यात येणार असून यामध्ये व्हीआयपी व्यवस्था, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, ज्येष्ठ नागरिक, महिला, पत्रकार यांच्यासाठी देखील स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येकासाठी भव्य अशी भोजन व्यवस्था, पार्किंग या सर्व गोष्टीची बारकाईने व्यवस्था करण्यात आली आहे. शिव परिवाराच्या आनंदात भर घालणाऱ्या या कार्यक्रमासाठी सर्व वैदर्भीय नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक ‘शिव परिवार’ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर, ॲड. जे.व्हि.पाटील पुसदेकर, सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा.सुभाषराव बनसोड, सुरेश दादा खोटरे, सचिव प्राचार्य डॉ.वि.गो.ठाकरे, डॉ. पद्माकर सोमवंशी,स्विकृत सदस्य प्राचार्य अंबादास कुलट, डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ,डॉ आजीवन सभासद बबनराव चौधरी, राजाभाऊ सुंदरकर,आदी मान्यवर उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि २९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## जन्मापुर्वीच घात, करतात गर्भपात...

# उमलण्यापूर्वीच कुस्करतात कळी, डॉक्टर घेतात अनेक बळी !

● अतिष देशमुख @ वाशीम ●

बीडमधील स्त्री भ्रूण हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला होता परळीतील डॉ. सुदाम मुंडे आणि डॉ. सरस्वती मुंडे यांची कृत्य ऐकल्यानंतर राज्यात संतापाची लाट पसरली होती असाच एका वर्षापूर्वी प्रकार रिसोड शहरातील लोणी फाटा येथील शिव मुळव्याध हॉस्पिटल व प्रस्तुती गृह येथे उघडकीस आला होता. रिसोड शहरामध्ये लोणी फाटा येथील शिव मुळव्याध हॉस्पिटल व प्रसुती गृह येथे स्त्रीभ्रूणहत्या होत असल्याचे गोपनीय माहितीच्या आधारावर कारवाई केली होती. त्यानंतर आता आरोग्य विभागाने कारजा येथील सोनोग्राफी सेंटरवर छापा टाकून लिंग चाचणी करतांना पाच महिला आढळल्या. त्यामुळे या पथकाने राठोड सोनोग्राफी राठोड मॅटर्निटी जनरल हॉस्पीटलवर कारवाई करून सोनोग्राफी मशिन सिल केली आहे. जिल्ह्यातील या दुसऱ्या धडक करवाईने जन्मापुर्वीच चिमुकल्याचा घात केल्या जात असून रिसोड नंतर आता कारंजातही नंतर मालेगावातही गर्भपात होत असल्याचे उघड झाले आहेत. उमलण्यापूर्वीच कळी कुस्करल्या जात असून पैशासाठी डॉक्टर अनेकांचे बळी घेत आहेत. या स्त्रिभ्रूण हत्येच्या गोरखधंद्यात एका वर्षापूर्वी जिल्ह्यातील रिसोड ,कारंजा नंतर आता मालेगावातील डॉक्टर बंदा अडकला आहे.

## *स्त्रिभ्रुण हत्येचा गोरख धंदा * रिसोड, कारंजा नंतर मालेगावात पकडला बंदा

### मालेगावाच्या माने सोनोग्राफी सेंटरमध्ये बेकायदेशीर गर्भलिंग निदान, आरोग्य विभागाने छापा टाकून केली कारवाई

### बेटी बचाव बेटी पढाव योजनां कागदावरच का ?

एकीकडे शासन बेटी बचाव बेटी पढाव यासाठी अनेक योजना राबवून व मुलीचा जन्मदर वाढावा यासाठी विविध प्रकारच्या योजना अमलात आणत आहेत मात्र बीड प्रकरणानंतर रिसोड, कारंजा व मालेगावमध्ये उघड झालेल्या ह्या प्रकरणामुळे सदर जनजागृतीला कुठेतरी खिळ बसत असल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरण उघडीस आल्यानंतर जनतेकडून रोष व्यक्त केला जात आहे.

### डॉक्टरांचे चॅलेंज, म्हणे प्रकरण करतो मॅनेज

कारंजा येथील डॉक्टर रंजनी राठोड व मालेगाव येथील डॉक्टर विवेक माने यांना राजकारणाची व्हाईट कॉलर असून काळ्या कृत्यानंतरही त्यांची वागण्याची कृती ताईट आहे. मानवतेला कळीमा फासणाऱ्या कृत्यामुळे राजकारणातून समाजकारणाचा खोटा आव आणणारे डॉ. राठोड व डॉ. माने यांच्या सोनोग्राफी सेंटरवर आरोग्य विभागाने धाड टाकल्याने हे उघड झाले आहेत. यावर डॉक्टरांनी राजकीय व पैशाच्या जोरावर चॅलेंज केले आहे. प्रकरण वरिष्ठ स्तरावरून मॅनेज करणार असल्याच्या वल्गना करीत आहेत. चोरच्या चोर वरून मुजोर असणाऱ्या कारंज्याच्या डॉ. राठोड मालेगाव चे डॉ. माने यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

वाशीमच्या मालेगांव येथील माने सोनोग्राफी सेंटरवर गर्भलिंग तपासणी करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे.या प्रकरणी डॉ.विवेक माने यांच्यासह चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलं असून यामध्ये सहभागी असलेल्या एका महिला डॉक्टरांचा नाव माहीत असतांना जाणीव पूर्वक अज्ञात दाखविण्यात आल्याची चर्चा .त्यामुळे ती महिला डॉक्टर कोण असा सवाल केला जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मालेगाव येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुहास वाहुले यांना माने सोनोग्राफी सेंटरमध्ये बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या तक्रारीची दखल घेत प्रशासनानं तातडीनं एक पथक तयार केलं आणि रुग्णालयात एक बनावट




रुग्ण (गर्भवती महिला) पाठवून सापळा रचला. या बेकायदेशीर तपासणीसाठी तब्बल २३ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. सोनोग्राफीची प्रक्रिया पूर्ण होताच, दबा धरून बसलेल्या आरोग्य पथकानं रुग्णालयावर छापा टाकला. मात्र कारवाईची कुणकुण लागताच तपासणी करणारी महिला डॉक्टर आणि मुख्य दलाल घटनास्थळावरून फरार झालेत .या प्रकरणी मालेगाव पोलिसांनी रुग्णालय संचालक डॉ. विवेक माने, कर्मचारी कृष्णा खडसे, गजानन वानखडे, दलाल दीपक बदर आणि एका अज्ञात महिला डॉक्टरविरुद्ध विविध कलमान्वये मालेगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.मात्र या प्रकरणात राजकीय दबाव टाकून संबंधित दोषी महिला डॉक्टरचा नाव कमी करण्यात आल्याची चर्चा आहे.आणि अज्ञात महिला डॉक्टर आरोपी असा, उल्लेख केला केला गेला आहे.त्यामुळे पोलीस आणि आरोग्य विभाग संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. ती महिला डॉक्टर कोण असा प्रश्न विचारला जात आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट शुक्रवार दि.१३ डिसेंबर २०२४

चिमुकल्याचा जन्मापुर्वीच घात, रिसोडमध्ये केला जातो गर्भपात

*स्त्रीभ्रूण हत्येचे प्रकरण उघडकीस * वैद्यकीय पथकाची धाड * डॉक्टर पती पत्नीवर गुन्हा दाखल

## थोडक्यात

### दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी

#### साहित्य वाटप शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

श्री. भगवान महावीर विकलांगता सहायता समिती, जयपूर (नवी दिल्ली शाखा) व दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी व सहाय्यक साहित्य वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील तीन ठिकाणी अनुक्रमे कवठा, वाशिम, कारंजा येथे प्रत्येकी दोन दिवशीय पार पडलेल्या या शिबिरांना लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दिव्यांग सहायता कक्षाचे प्रमुख शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांच्या पुढाकारातून या शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन केले.शिबिरामध्ये दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांची तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार विविध सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृत्रिम अवयव, जयपूर फुट, व्हीलचेअर, हाताने चालविण्याच्या तीन चाकी सायकली, कर्णयंत्रे, कॅलिपर, कुबड्या, वॉकर, काठी, कमोड चेअर, बेल्ट आदी साहित्यांचा समावेश होता. तसेच दिव्यांग सहायता पोर्टलवर लाभार्थ्यांची नोंदणी देखील करण्यात आली.कवठा , वाशिम आणि कारंजा येथे पार पडलेल्या शिबिरांमधून एकूण १ हजार ७५७ विविध सहाय्यक साहित्यांचे वितरण करण्यात आले. यामध्ये २६९ कर्णयंत्रे, २२४ हाताने चालविण्याच्या तीन चाकी सायकली, २२६ व्हीलचेअर, २०२ चालण्याच्या काठ्या, ९७ एल.एस. बेल्ट, ८४ कमोड चेअर तसेच विविध प्रकारचे कृत्रिम अवयव व सहाय्यक उपकरणांचा समावेश आहे.या उपक्रमामुळे दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवन अधिक सुलभ करण्यासाठी मोठा आधार मिळाल्याची भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली.

### डिएपी खतास पर्यायी खते वापरण्याचे कृषी विभागाचे आवाहन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शेतकऱ्यांनी चालू खरीप हंगामामध्ये केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात येत येत आहे.

राज्यामध्ये मागील ३ वर्षात खरीप हंगामात ४४ लाख मे.टन रासायनिक खतांचा वापर झाला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश) संयुक्त खते व एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खतांचा वापर केला जातो. महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचेआधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे.

राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतक-यांकडून जास्त मागणी होणार आहे. डिएपी खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे.

## बांधकाम विभाग भ्रष्टाचाराचा अड्डा, रस्त्यावर जीवघेणा खड्डा !

### नगरसेवक राजु वानखेडे यांच्या अपघातानंतर आली जाग, मात्र कायम भ्रष्टाचाराचा भाग

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम शहरातून काटा रोडकडे जाताना गावालगत असलेल्या पुलाची अवस्था अत्यंत धोकादायक बनली असून पुलावरील मोठा खड्डा आणि दबलेला भाग अनेक दिवसापासून वाहनचालकांसाठी जीवघेणा ठरत आहे. याच खड्ड्यात नगरसेवक, युवा नेते राजु वानखेडे यांच्या कारचा अपघात झाला. सुदैवाने जिवीत हानी टळली. मात्र विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा वेगात जाताना हा खड्डा लक्षात न आल्याने वारंवार अपघात घडत असल्याची गंभीर बाब समोर आली. या संबंधि राजु वानखेडे यांनी कार्यकारी अभियंत्यांना धारेवर धरले. त्यानंतर तात्पूरता का होईना खड्डा दुरूस्त करण्यात आला.

नगरसेवक राजू वानखेडे यांनी सांगितले की, पुलावरील खड्डा न दिसल्याने त्यांच्या चारचाकी वाहनाला जोरदार धडक बसली. या अपघातात गाडीचा बोनट तुटला, समोरील काच फुटली तसेच काचेचे तुकडे डोळ्यात गेल्याने मोठी दुर्घटना टळली. या अपघातात सुमारे ७० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. संबंधित पुलाचा काही भाग दबलेला असून वाहन चालविताना अचानक धक्का बसतो. त्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. रोज किरकोळ अपघात घडत असतानाही बांधकाम विभाग प्रशासन निद्रावस्थेत होते. नगरसेवक राजु वानखेडे यांच्या अपघातानंतर वानखेडे यांनी आक्रमक भूमीका घेत कार्यकारी अभियंत्याला धारेवर धरले. त्यामुळे का होईना हा खड्डा बुजविण्यात आला. अशेच जिल्ह्यातील अनेक रस्त्यावरील जीवघेणे खड्डे कार्यकारी अभियंत्यांनी बुजवावे व नागरिकांचे जीव वाचवावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



### सावता परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी

## रवि भांदुर्गे यांची निवड

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



येथील युवासेनेचे जिल्हाध्यक्ष रवि भांदुर्गे यांची सावता परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणकाका आखाडे यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष गणेश दळवी व प्रदेश कार्याध्यक्ष पांडूरंग कोठाळे यांनी ही निवड जाहीर केली. याबाबत सोमवार, २५ मे रोजी भांदुर्गे यांना निवडीचे पत्र प्राप्त झाले.

रवि भांदुर्गे यांच्या सामाजीक व राजकीय कार्याची दखल घेवून त्यांच्यावर प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. माळी समाजहिताच्या व अस्मितेच्या प्रश्नासोबतच समाजाच्या सर्वांगीण हितासाठी सावता परिषदेच्या ध्येय धोरणानुसार कार्यरत राहून परिषदेच्या कार्याचे जाळे महाराष्ट्रात सर्वत्र विणावे व संघटनेचा विस्तार वाढवावा असे निवडपत्रात नमूद करण्यात आले आहे. जिल्हयाच्या राजकीय क्षेत्रात गेल्या १४ वर्षापासून युवासेना जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत असतांना रवि भांदुर्गे यांनी सामाजीक संवेदनाही जपली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेवून त्यांच्यावर प्रदेश उपाध्यक्ष या महत्वाच्या पदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून या जबाबदारीच्या माध्यमातुन आपण महाराष्ट्रात माळी समाजाची एकजुट निर्माण करुन समाजाची राजकीय व सामाजीक शक्ती अधिक बळकट करु अशी ग्वाही रवि भांदुर्गे यांनी निवडप्रसंगी दिली.

## वाशीममध्ये सावता परिषदेची 'जनगणना परिषद' !

### ओबीसी प्रश्नांवर होणार सखोल मंथन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

सावता परिषदेच्या वतीने येत्या ७ जून रोजी वाशीम शहरात भव्य 'जनगणना परिषद' आयोजित करण्यात आली असून, या परिषदेत राज्यभरातील सावता परिषद व विविध ओबीसी संघटनांचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. ओबीसी समाजाची जनगणना, सामाजिक हक्क, आरक्षण व संघटनात्मक बळकटी या महत्त्वपूर्ण विषयांवर या परिषदेत सखोल चर्चा होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणारी ही एकदिवसीय परिषद ओबीसी समाजाच्या प्रश्नांना दिशा देणारी ठरणार असल्याचे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. ही बैठक सावता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी प्रदेश सहसचिव प्रवीण वाघमारे, प्रदेश उपाध्यक्ष रवि भांदुर्गे, अकोला जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव निखाडे, खामगाव जिल्हाध्यक्ष दत्ता जावळकर, वाशीम जिल्हाध्यक्ष विलास ढगे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रंजनाताई परिसकर, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष शेखर जटाळे, वाशीम जिल्हा उपाध्यक्ष रवि वानखेडे, शहराध्यक्ष चेतन इंगोले, पातूर तालुका अध्यक्ष अजय ढोणे, अकोला जिल्हा उपाध्यक्ष छोटू काळपांडे, वाशीम तालुका अध्यक्ष बाळूभाऊ माल यांच्यासह तिन्ही जिल्ह्यांतील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.तसेच अमोल धामणकर, अमोल चरखे, गजानन उठाळे, चेतन शिंदे, रेखाताई जहीरव, दिपाली काळे, दिनेश सोळंके, मंगला भांदुर्गे, शितल जाधव, ज्योती जाधव, नीता जाधव, वंदना वानखेडे, सुनिता पुंड, ज्योती इरतकर, अपर्णा सोनवणे, गोदावरी रतकर, गीता भांदुर्गे, ज्योती सोनवणे, शोभा इरतकर, वंदना भांदुर्गे आदींची उपस्थिती लक्षणीय होती. याचवेळी गजानन ठेंगडे, अमोल गाभणे, सुनील वानखेडे, आकाश गायकवाड, रवी खोटे आणि शाम दळवी यांचा सावता परिषदेत प्रवेश करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

### महिन्याभरानंतरही आपले सरकार पोर्टलचा तांत्रिक बिघाड...

## नागरिक, विद्यार्थी त्रस्त, यंत्रणा सुस्त !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

राज्य शासनाच्या विविध ऑनलाइन सेवांसाठी महत्त्वाचे मानले जाणारे 'आपले सरकार' पोर्टल गेल्या महिनाभरापासून तांत्रिक बिघाडामुळे संथ झाली आहे. २८ एप्रिलपासून सुरू झालेली ही समस्या मे महिन्याचा शेवट आला, तरी कायम असल्याने जिल्ह्यातील नागरिक, विद्यार्थी आणि पालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेषतः नुकताच दहावीचा निकाल लागल्याने अकरावी आणि पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारी कागदपत्रे काढताना विद्यार्थ्यांची दमछाक होत आहे.

आपले सरकार पोर्टल ठप्प असल्याने विद्यार्थी आणि पालकांचा जीव टांगणीला लागला आहे, तर नागरिक दाखल्यांसाठी महा-ई-सेवा केंद्रांत चकरा मारत आहेत. सर्व्हर चालत नसल्यामुळे आमचा व्यवसायही बुडत आहे. शासनाने नवीन प्रणालीतील तांत्रिक बिघाड तातडीने दूर करावा.

**संदीप सरकटे,** आपले सरकार सेवा केंद्र, हराळ

### केंद्र चालकांमध्ये तीव्र नाराजी; जुने पोर्टल सुरू ठेवण्याची मागणी....

सुरुवातीला केंद्र चालकांना हा नियोजित देखभालीचा भाग असून, काही तासांत सेवा पूर्ववत होईल, असा संदेश देण्यात आला होता; मात्र महिना उलटूनही परिस्थिती जैसे थे असल्याने जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्र चालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. केंद्र चालकांनी शासनाकडे मागणी केली आहे की, या तांत्रिक अडचणींवर तातडीने तोडगा काढावा. नवीन प्रणाली पूर्णपणे सुरक्षित आणि सुरळीत होईपर्यंत जुने पोर्टल व्यवस्थित सुरू ठेवावे, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळेल आणि नागरिकांना वेळेत सेवा मिळेल.

दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी आता अकरावी आणि तंत्रनिकेतन प्रवेशाच्या तयारीला लागले आहेत. या प्रवेशासाठी आवश्यक असलेले उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचा दाखला, रहिवासी दाखला, आणि नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थी व पालकांनी जिल्ह्यातील 'आपले सरकार' सेवा केंद्रांवर गर्दी केली आहे. मात्र, पोर्टल सतत बंद राहणे, सर्व्हर प्रतिसाद न देणे आणि फोटो अपलोड न होणे या तांत्रिक त्रुटींमुळे अनेक अर्ज प्रलंबित पडले आहेत. वेळेत कागदपत्रे न मिळाल्यास प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहावे लागेल, अशी भीती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. हा तांत्रिक बिघाड केवळ शैक्षणिक दाखल्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. जिल्ह्यातील इतर सामान्य नागरिकांनाही याचा मोठा फटका बसला आहे.

### कामगार मंडळातील भ्रष्टाचाराच्याविरोधात

## क्रांतीकारी शेतकरी आक्रमक !

#### दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करा- बालाजी मोरे

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●



रिसोड : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वाशीम कार्यालयातील कथित भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांविरोधात क्रांतिकारी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष मा. श्री. बालाजी मोरे पाटील यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे आयुक्त यांना निवेदन सादर केले.

सदर निवेदनात वाशीम येथील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कामगारांशी उद्धट व अपमानास्पद वर्तन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच कामगार नोंदणी, नूतनीकरण, शैक्षणिक व आरोग्य अर्थसहाय्य, भांडे किट वाटप यांसारख्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

संघटनेने बनावट कागदपत्रांच्या आधारे मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. यासोबतच सर्व मंजूर प्रकरणांची पडताळणी, संपूर्ण चौकशीचे व्हिडिओ चित्रिकरण, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि कामगारांशी गैरवर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुकवार, दि. २९ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# बसमध्ये चढताना महिलेच्या गळ्यातील पोथ लंपास

**शेगाव:** येथील बसस्थानकात एसटी बसमध्ये चढत असताना एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील २१ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुरुवारी (दि. २८) अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कमलबाई श्रीकृष्ण भटकर (६५, रा. निपाणा, ता. खामगाव) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, त्या २३ मे रोजी सायंकाळी शेगाव बसस्थानकात एसटी बसमध्ये चढत होत्या. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत चोरून नेली. चोरी झालेल्या पोतमध्ये अंदाजे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेडॉल व सुमारे ४ ग्रॅम वजनाचे चौकोनी सोन्याचे मणी होते. या दागिन्यांची एकूण किंमत सुमारे २१ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# शेतकऱ्यांना एमआरपी दराने खत विक्री करावी

## खतांची कृत्रिम साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांची परवाने रद्द करा

### सानंदांच्या निवेदनाची तात्काळ दखल; कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हा कृषी अधीक्षकांना दिले कारवाईचे निर्देश

प्रतिनिधी २९ मे

**खामगाव:** आगामी खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना डीएपी व युरिया खतांचा आवश्यक आणि निर्धारीत दरात पुरवठा व्हावा, तसेच खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणी संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी मंगळवार दि.२६ मे २०२६ रोजी मुंबई येथील कृषी मंत्र्यांच्या दालनामध्ये राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेवुन निवेदन सादर केले. या निवेदनाची तात्काळ दखल घेत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुलढाणा जिल्हा कृषी अधिक्षक व संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कारवाई करण्याचे लेखी निर्देश दिले आहेत.

निवेदन सादर करतांना सानंदा यांनी कृषीमंत्र्यांसोबत चर्चा करतांना सांगितले की, खामगाव व शेगाव तालुक्यासह बुलढाणा जिल्हयातील अनेक कृषी केंद्र चालकांनी मोठ्या प्रमाणात डीएपी आणि युरिया खतांचा साठा करून ठेवला आहे. शेतकऱ्यांनी खतांची मागणी केल्यानंतर त्यांना खत उपलब्ध करून दिले जात नसून, काही ठिकाणी डीएपी किंवा युरिया घेण्यासाठी इतर खतांची जबरदस्तीने लिंकिंग केली जात आहे. तर काही कृषी केंद्र संचालकांकडून सध्या १३५० रुपये कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) असलेली डीएपीची गोणी तब्बल १७५० रुपयांना विकली जात असून, २६६ रुपये किंमतीची युरियाची गोणी ३५० रुपयांपर्यंत विक्री केली जात असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू असल्याचे सानंदा यांनी कृषीमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. शेतकरी हिताचे सरकार म्हणून कृषी विभागाने या गंभीर प्रकाराला वेळीच आळा घालावा, कृत्रिम साठेबाजी थांबवावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी सानंदा यांनी निवेदनात केली होती.

**निवेदनाची तात्काळ दखल : कृषी विभागाने केली भरारी पथकाची नेमणुक**

सानंदांनी दिलेल्या निवेदनाची तात्काळ दखल घेत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक यांना कठोर कारवाईचे निर्देश दिले आहे. दरम्यान, जिल्हा कृषी अधीक्षकांनी कृषीमंत्र्यांच्या आदेशानुसार खामगाव व शेगाव तालुक्यासाठी विशेष भरारी पथकाची नेमणुक केली आहे. तसेच कृषी विभागाकडून सर्व कृषी केंद्र चालकांच्या मोबाईल व्हॉटस?पवर खतांचा काळाबाजार टाळण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. जादा दराने खत विक्री, लिंकिंगची सक्ती किंवा नियमबाह्य व्यवहार आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार परवाने रद्द करण्याचाही इशारा कृषी विभागाने दिला आहे. तसेच बाहेरील जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खत विक्री न करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, प्रत्येक दुकानात खतांचे अद्ययावत दरफलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. लिंकिंगला नाही म्हणा हा फलक अनेक दुकानांमध्ये नसल्याचे निदर्शनास आल्याने तो तात्काळ लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा संबंधितांना नोटीस बजावण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संपूर्ण कृषी विभाग शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा शब्द दिला व आपल्या निवेदनाची तात्काळ दखल घेवुन शेतकरी हितासाठी संबंधित यंत्रणा कार्यान्वीत केल्याबददल माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी शेतकऱ्यांच्या वतीने कृषीमंत्र्यांचे आभार मानले आहेत. शेतमालाला योग्य भाव नाही, कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ अश्या अस्मानी संकटामुळे सुध्दा जगाचा पोशिंदा बळीराजा हा आर्थिक संकटात सापडला आहे अश्या परिस्थितीमध्ये बळीराजाला कर्तव्य बुध्दीतुन सहकार्य करावे असे सानंदा यांनी सांगितले आहे. ज्या ठिकाणी कृषी विक्रेत्यांकडुन खतांची कृत्रीम साठेबाजी किंवा काळा बाजार केला जात असेल तर शेतकऱ्यांनी त्याची सर्व पुराव्या निशी आपल्याकडे तक्रार करावी. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून शेतकरी बांधवांना न्याय मिळवुन दिले जाईल असे आवाहन सुध्दा सानंदांनी केले आहे.

# खामगावात दोघांचा संशयास्पद मृत्यू

## शहर पोलिस ठाण्यात मर्ग दाखल

प्रतिनिधी २९ मे

**खामगाव:** शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या संशयास्पद मृत्यूंची नोंद झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दोन्ही घटनांमध्ये कलम १९४ बीएनएसएसनुसार कायम मर्ग दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

पहिल्या घटनेत अकोला येथील प्रसाद सोसायटी, गोकुळ कॉलनी परिसरातील रहिवासी विरेश वंसतराव ढोके वय ४५ यांना २७ मे रोजी सायंकाळी मृत अवस्थेत खामगाव येथील सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मोहाडी ता. खामगाव हद्दीत ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. डॉ. वेदांती शिंगाडे यांच्या लेखी मेमोवरून कक्षसेवक छगण महादेव भोयर यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर खामगाव शहर पोलिसांनी कायम मर्ग दाखल केला. या प्रकरणाचा प्राथमिक तपास पोहेकॉ नारायण चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत खामगावातील शिवाजी वेस परिसरातील रहिवासी सागर संतोष पुरोहित वय ३० यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. अनुपम स्टोअरसमोरील फरशी परिसरात ते बेशुध्द अवस्थेत पडलेले आढळून आले होते. त्यानंतर आनंद गांधी यांनी त्यांना तातडीने सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणीही डॉ. वेदांती शिंगाडे यांच्या तर्फे कक्षसेवक छगन महादेव भोयर यांनी दिलेल्या माहितीवरून कायम मर्ग क्रमांक २०/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मृत्यूमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

# जानव्ही माहुरे हिला संजय गांधी निराधार योजनाचा मिळाला आधार

### मंजुरी पत्र नायब तहसीलदार वसावे व जिल्हाध्यक्ष इंगळे यांच्या हस्ते प्रदान

प्रतिनिधी २९ मे

**खामगाव:** मदत ही फक्त एक कृती नसते, तर ती एक भावना असते. अडचणीच्या वेळी मिळालेला हात हा केवळ आधार देत नाही, तर पुढे जाण्याची हिंमतही देतो.

त्याचवेळी माहिती असलेली गोष्ट दुसऱ्याला सांगणे म्हणजे ज्ञान वाटणे. समाज याच देवाणघेवाणीवर उभा राहतो. जी मदत समोरच्याला स्वावलंबी बनवते मदत उपलब्ध करून देणे म्हणजे विश्वासाचे नाते तयार करणे. शब्दांनी दिलेला आधार कधी कधी पैशांपेक्षाही मोलाचा ठरतो.

अशाच प्रकार खामगाव येथे दाळ फाईल भागात झाला आहे



याठिकाणी वास्तव्यास असलेले माहूरे कुटुंब परिस्थिती एकदम हलाखीची त्यात एक सहा वर्ष वयाची जानव्ही ही जन्म पासून दोन्ही डोळ्याने अंध याची माहिती त्या भागात असलेल्या विराट मल्टिपर्पज फाउंडेशन जिल्हा अध्यक्ष कविता इंगळे यांना मिळाली त्यांनी आधी तिला udid आधारित १००ज्ञ् अंधत्व चे प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले

तिच्या परिवाराची परिस्थिती एकदम नाजूक असल्याने तिला अर्थ सहाय्य उपलब्ध व्हावे याकरिता संजय गांधी निराधार योजना अनुदान तत्काळ सुरू व्हावे यासाठी मा तहसीलदार सुनील पाटील यांच्या कडे सर्व परिस्थिती मांडताच त्यांनी संजय गांधी निराधार योजना नायब तहसीलदार शिरीष वसावे यांना यासाठी लक्ष देण्याचे सांगत तत्काळ प्रकरण निकाली काढले. याचे मंजुरी पत्र आज कू जानव्ही बजरंग माहूरे हिला तिच्या गौरक्षण रोड श्री गजानन महाराज मंदिर जवळ खामगाव येथे सं गां यों नायब तहसीलदार शिरीष वसावे विराट मल्टिपर्पज फाउंडेशन बुलढाणा जिल्हा अध्यक्ष कविताताई इंगळे खामगाव नगर परिषद भाजपा गट नेते विजय उगले प्रहार शहर अध्यक्ष जिल्हा उपाध्यक्ष शत्रुघन इंगळे पल्लवी ताई पाटील प्रदीपभाऊ वेरुळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मिठाई भरवित देण्यात आले. यावेळी गजानन दामोदर ज्योती माहूरे कांता माहूरे गणेश बऱ्हाणपूरे यश इंगळे शैलेश गवई यासाठी यावेळी उपस्थित होते. देविदास कल्याणकर व विराट मल्टिपर्पज फाउंडेशन यांचे योगदान लाभले.

# इंधन दरवाढी विरोधात काँग्रेसचे आंदोलन

### मेलोडी चॉकलेट वाटून केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांचा निषेध

प्रतिनिधी २९ मे

**खामगाव:** देशात सातत्याने होणारी इंधन दरवाढ आणि महागाई विरोधात तसेचे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आज दि.२८ मे रोजी बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभाग व खामगाव विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

यावेळी केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांचा निषेध करत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर घोषणाबाजीने दणाणून सोडला. तसेच नागरिकांना मेलोडी चॉकलेटचे वाटप करून भाजपा सरकारचा अनोखा निषेध नोंदविण्यात आला. त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपती व राज्यपाल यांना मागण्यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले. सदर निवेदनामध्ये केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे दिवसेंदिवस इंधन दरवाढ होत असून शेतकऱ्यांना वेळेवर डिझेल मिळत नाही, त्यांना डिझेल पंपावर तासंतास रांगेत उभे राहावे लागत असून त्याचा शेतीच्या कामावर परिणाम होत आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेती मालाला म्हणजे कांद्याला योग्य भाव मिळत नाही तर दुसरीकडे बी बियाणे व रासायनिक खतांच्या किंमती सुध्दा खूप वाढल्या असून यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. तरी सरकार व प्रशासनाने तातडीने पेट्रोल व डिझेलचे दर कमी करावेत, शेतकऱ्यांना शेती कामासाठी डिझेलचा पुरवठा सुरळीत करावा, कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा, शेतकऱ्यांना पाहिजे ते खत दरवाढ न करता, लिंकींग न करता उपलब्ध करून देण्यात यावे, बि बियाणे विक्री मध्ये यापूर्वी काळाबाजार व बोगस बियाणे विक्री झाल्याचे प्रकार घडलेले आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारचे बि बियाणे माफक व रास्त दरात उपलब्ध करुन देण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभाग अध्यक्ष ॲड.अशोक इंगळे, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष तेजेंद्रसिह चौहाण, शहराध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, शेगाव तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शेजोळे, जिल्हा सरचिटणीस संजय तायडे, खरेदी विक्री संघाचे संचालक पांडुरंग राखोंडे, कृउबास संचालक प्रमोद चिंचोळकर, ओबिसी तालुकाध्यक्ष गुलाबराव निंबाळकर, विमुक्त जाती विभागाचे तालुकाध्यक्ष संदिप राठोड, सेवादलाचे तालुकाध्यक्ष सोपान पाटील, किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रकाश इंगळे, एनएसयुआय चे तालुकाध्यक्ष साहिल देशमुख, शहराध्यक्ष सौरभ रिछारिया, श्रिकृष्ण मोरे, निलेश देशमुख, ॲड. अविनाश इंगळे, राजकुमार शेगोकार, सुधाकर डुकरे, दिलीपसिंह राजपुत, गणेशराव खराटे, लक्ष्मणराव मिरगे, अमित तायडे, अजय पवार, अमोल वावगे, विठ्ठल हिंगणे, ओम डांगे, कृष्णा बोदडे, गणेश तायडे, गजाननराव हिंगणे, रविंद्र सोळंके, वैभव तायडे, महादेव बुंदे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विवाहितेचा संशयास्पद मृत्यू

प्रतिनिधी २९ मे

**मलकापूर:** तालुक्यातील विवरा येथे २५ वर्षीय विवाहितेचा संशयास्पद मृतदेह विहिरीत आढळून आल्याने गुरुवारी (दि.२८) खळबळ उडाली. या घटनेनंतर मृत महिलेच्या संतप्त नातेवाईकांनी सासरच्या साहित्याची तोडफोड करत रोष व्यक्त केला. परिस्थिती तणावपूर्ण बनल्याने पोलिसांसह राखीव पोलीस दलाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, खान्देशातील बोदवड तालुक्यातील सुरोडा येथील रहिवासी सरीता (वय २५) हिचा विवाह विवरा येथील धनराज पाटील यांच्यासोबत झाला होता. व या दाम्पत्याला चार वर्षांचा मुलगा आहे. सासरच्या मंडळींकडून शारीरिक मानसिक छळ होत असल्याची तक्रार सरीता हिने दि.२७ मे रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिली होती. त्यावर अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, गुरुवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास सरीता हिचा मृतदेह घरालगतच्या विहिरीत आला. आढळून घटनेची माहिती गावात पसरताच परिसरात एकच खळबळ उडाली. ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांचे उपनिरीक्षक दिपक वारे पथकासह घटनास्थळी दाखल झाले.

# रेल्वे उडाण पुलाचे काम १८ महिन्यांत पूर्ण होणार- संचेती

प्रतिनिधी २९ मे

**नांदुरा:** बहुप्रतीक्षित नांदुरा रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामाला गती देण्यात आली असून, सध्या माती परीक्षण, स्थळ निरीक्षण व सर्वेक्षणाची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मलकापूर मतदारसंघाचे आमदार चैनसुख संचेती यांनी दिली. कामाचा कालावधी १८ महिने निश्चित करण्यात आला आहे. गुरुवारी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी या प्रकल्पाबाबत माहिती दिली.

यावेळी नगराध्यक्षा मंगला मुर्हेकर, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष यश संचेती, भाजप



नेते बलदेव चोपडे, शिवाजी पाटील, शहराध्यक्ष प्रमोद हिवाळे, नगरसेवक प्रमोद खोंड, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता चव्हाण, भाजप युवा नेते दिग्विजय डांगे तसेच कंपनीचे प्रतिनिधी तुषार चौधरी उपस्थित होते. आ. संचेती यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वरील रेल्वे उड्डाणपूल व जोडरस्त्यांचे बांधकाम ईपीसी पद्धतीने करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची एकूण लांबी १.५३८ कि.मी. असून, सुधारित प्रशासकीय मान्यता सुमारे २१०.४८ कोटी रुपयांची आहे. प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक मंजुरी मिळाली असून, निविदा प्रक्रियेनंतर धाराशिव येथील कंपनीची कंत्राटदार म्हणून निवड करण्यात आली आहे.

**वाहतूक कोंडीवर दिलासा**

नांदुरा रेल्वे फाटक परिसरात नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. उड्डाणपूल उभारल्यानंतर रेल्वे फाटकावरील प्रतीक्षा वेळ कमी होणार असून, नागरिकांना सुरक्षित व अखंड प्रवासाची सुविधा उपलब्ध होत अपघातांचे प्रमाण कमी होणार आहे.

# खामगाव आगारात नव्या सहा 'शिवाई' बस दाखल कामगार मंत्र्यांनी केली बसची सैर

प्रतिनिधी २९ मे

**खामगाव:** प्रवाशांच्या सेवेत अधिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने खामगाव एसटी आगाराला नव्या ’शिवाई न बस प्राप्त झाल्या असून, मंजूर झालेल्या २९ बसपैकी पहिल्या टप्प्यात सहा बस आगारात दाखल झाल्या आहेत. या नव्या बसचे लोकार्पण गुरुवारी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एसटी विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच खामगाव नगरपालिकेतील नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकार्पणानंतर मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी नव्या बसमधून प्रवास करत बसची पाहणी केली व प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार सेवा देण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. खामगाव आगाराला नव्या बस मिळाल्याने ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. जुन्या बसेसच्या तुलनेत ’शिवाई’ बस अधिक आधुनिक सुविधांनी सुसज्ज असून प्रवास अधिक सुखकर होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, उर्वरित मंजूर बसही लवकरच आगारात दाखल होणार असल्याची माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.

# ग्राहक बनून आला अन् ६० हजारांचा गल्ला साफ!

### नांदुऱ्यात किराणा दुकानात दिवसाढवळ्या चोरी

प्रतिनिधी २९ मे

**नांदुरा:** शहरातील बुलढाणा रोडवरील एका किराणा दुकानात ग्राहक बनून आलेल्या अज्ञात चोरट्याने दुकानदाराची नजर चुकवत गल्ल्यातील तब्बल ६० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, मदतीच्या बहाण्याने विश्वास संपादन करून आरोपीने ही चोरी केल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी नांदुरा पोलिसांत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिंधी कॉलनी, आठवडी बाजार परिसरातील रहिवासी सागर प्रकाशलाल रामचंदानी यांचे बुलढाणा रोडवरील वॉटर सप्लाय कॉम्प्लेक्समध्ये किराणा दुकान आहे. २३ मे रोजी सकाळी त्यांनी बँकेत भरण्यासाठी आणलेले ६० हजार रुपये दुकानातील गल्ल्यात ठेवले होते. दुपारी सागर हे जेवणासाठी घरी गेले असताना दुकानात त्यांचे वडील एकटेच होते. याचदरम्यान एक अज्ञात व्यक्ती ग्राहक बनून दुकानात आला. सुरुवातीला त्याने दुकानातील पोते उचलण्यास मदत केली. त्यानंतर साखर व तांदूळ मागवून दुकानदाराला दुकानाच्या मागील बाजूस पाठवले. ही संधी साधत आरोपीने काउंटरमधील रोकड चोरून पोबारा केला. विशेष म्हणजे, कोणताही माल न घेता तो दुकानातून निघून गेला. सागर रामचंदानी दुकानात परतल्यानंतर गल्ल्यातील पैसे गायब असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर शेजारील दुकानातील सीसीटीव्ही फूटेज तपासण्यात आले असता संशयित व्यक्ती दुकानात येताना व घाईघाईने बाहेर पडताना दिसून आला. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस हवालदार मिलिंद जवंजाळ करीत आहेत.

# धानोरा येथील विवाहितेच्या आत्महत्येनंतर पती, दिरावर गुन्हा

प्रतिनिधी २९ मे

**जळगाव जामोद:** तालुक्यातील धानोरा येथे विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या प्रकरणात पती व दिराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सततची मारहाण व मानसिक छळाला कंटाळून विवाहितेने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. मृत विवाहितेचे नाव कांचन देवानंद हनवते असे असून, याप्रकरणी तिचा भाऊ गणेश शांताराम इंदोरे (२५, रा. रेल, ता. अकोट, जि. अकोला) यांनी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, कांचन हिचा विवाह सहा वर्षांपूर्वी देवानंद महादेव हनवते यांच्यासोबत झाला होता. विवाहानंतर पती देवानंद हनवते व दीर दीपक महादेव हनवते हे ’भाजीत मीठ कमी आहे’, ’टीव्ही पाहते’, ’घरकाम व्यवस्थित करत नाही’ अशा कारणांवरून वारंवार शिवीगाळ, मारहाण व मानसिक त्रास देत होते, असा आरोप करण्यात आला आहे. या सततच्या त्रासामुळे कांचन हिने दि. २७ मे रोजी सकाळी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# हजारो मुस्लिम बांधवांनी ईद-उल-अजहाची नमाज केली अदा

प्रतिनिधी २९ मे

**खामगाव:** २८ मे २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता सजनपुरी येथील ईदगाह येथे हजारो मुस्लिम बांधवांनी ईद-उल-अजहाची नमाज अदा केली. फाटकपुरा मशिदीचे पेश इमाम हाफिज सरफराज खान साहेब यांनी नेतृत्व करुन ईद ची नमाज पठण केली ईदच्या नमाजानंतर, हाफिज सरफराज खान साहेब यांनी खुतबा दिला नंतर सामूहिकरीत्या दुआ(प्रार्थना) मागितली त्यामध्ये त्यांनी देशात आणि खामगाव शहरात शांतता व सलोखा नांदावा, एकमेकांमध्ये प्रेम, स्नेह आणि बंधुभाव टिकून राहावा, आपल्या



मातृभूमी हिंदुस्तानचे दहशत आणि भीतीपासून रक्षण व्हावे, जगातील सर्व मानवते चे रक्षण करावे तसेच वीर जवानांचे आरक्षण करावे आजारी लोकांना आरोग्य लाभावे, अशा सामूहिक प्रार्थना करण्यात आल्या. याशिवाय, पावसाळा सुरू व्हावा आणि आशीर्वादांचा वर्षाव व्हावा यासाठीही प्रार्थना करण्यात आल्या. नमाजानंतर, मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. ईदगाह नंतर मुस्लिम बांधवांनी स्थानिक बार्डे प्लॉट येथील कब्रस्तान जाऊन आपल्या नातेवाईकांच्या कबरींसाठी प्रार्थना केली. ईदगाहमध्ये लहान मुलांसाठी खेळण्यांचे दुकान उभारण्यात आले होते, जिथे मुलांनी भरपूर खरेदी केली. ईदगाह आणि शहरातील विविध परिसरांमध्ये कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ईदगाहच्या नमाजापूर्वी, मुस्लिम बांधवांनी सकाळी ६:३० ते ८:३० दरम्यान शहरातील विविध मशिदींमध्ये नमाज अदा केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. २९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला मूर्तीजापूर रोडवर ब्राउज़र द्वारा डिझेलचा काळाबाजार

प्रतिनिधी २९ मे

**अकोला :** जिल्ह्यातील ग्रामीण भागात सध्या डिझेलची कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे. काळाबाजार करणारे कॅन, ड्रम मध्ये डिझेल भरून साठेबाजीला लागले आहेत. गावातील जेसीबी, ट्रॅक्टर चालकांना डिझेल विक्रीचा काळा धंदा सुरू झाला आहे. तर दुसरीकडे मान्सूनपूर्व नांगरणी, कुळवणी पेरणीपूर्व मशागत आदी कामांसाठी शेतकरी युद्ध पातळीवर तयारी करत असताना डिझेल अभावी ट्रॅक्टर व कृषी यंत्रसामग्री ठप्प पडण्याची वेळ आली आहे. नांगरायला 'बैल मिळे ना तर पंपावरती डिझेल मिळे ना' अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. तर दुसरीकडे जिल्ह्यात काही मोजके ग्राहक असे आहेत की त्यांच्याकडे स्थिर उपकरणे आणि अवजड मशिनरी आहेत जसे की गिट्टी खदान व्यवसायी, एमआयडीसी परिसरातील काही कारखाने




## पुरवठा विभागाचे दुर्लक्ष

अशा व्यवसायिकांना डिझेल पुरवण्यासाठी काही पेट्रोल कंपन्यांनी ब्राउझर उपलब्ध केले आहेत. अशा उद्योगांना घरपोच डिझेलचा पुरवठा या ब्राउझर द्वारे केला जातो. या सुविधेमुळे या ग्राहकांच्या वेळेची बचत तसेच डीजेलची सुरक्षित डिलिव्हरी मिळते. ४००० लिटरची क्षमता असलेल्या या ब्राउझर द्वारे रोज अशा कारखान्यांना व उद्योगांना बेसुमार पुरवठा केला जात आहे. आणि तेही चढ्या दराने, डिझेलची कमतरता असल्याने हे कारखानदार व उद्योजक मुकाटपणे चढ्या भावाने घरपोच डिझेल मिळत असल्याने विकत घेत आहेत. कारखाने तसेच गिट्टी खदान पासून पेट्रोल पंप दूर असल्याने वारंवार पेट्रोल पंपावर जाऊन डिझेल आणणे खर्चिक आणि वेळखाऊ ठरत आहे. त्यामुळे ब्राउझर द्वारे घरपोच मिळणारे काळा बाजारातील इंधन घेण्याकडे या व्यवसायिकांचा कल वाढत आहे. तर दुसरीकडे पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू असून डिझेल मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या कामाचा खोळंबा होत आहे. शेतकरी डिझेल साठी या पेट्रोल पंपावरून त्या पेट्रोल पंपावर चकरा मारत आहेत. तर दुसरीकडे पेट्रोल कंपन्या ब्राउझर द्वारे गिट्टी खदान व्यावसायिक तसेच एमआयडीसी परिसरातील मोठ्या कारखान्यांना घरपोच डिझेल विक्री करून आपले उखळ पांढरे करून घेत आहेत. राजरोसपणे ब्राउझर द्वारे चढ्या भावाने कारखानदारांना व गिट्टी खदान व्यवसायिकांना चढ्या भावाने डिझेल विक्री होत असताना पुरवठा विभागाचे मात्र याकडे साफ़ दुर्लक्ष होत आहे. पुरवठा विभागाच्या डोळ्यात धुळ फेकून चाललेल्या या डिझेल विक्रीच्या व्यवहारावर अंकुश लावण्याची मागणी होत आहे.

# महावितरणच्या 'फेक ई-मेल' षडयंत्रामुळे अकोल्यातील कंत्राटदाराला 15 कोटींचा फटका

प्रतिनिधी २९ मे

◆ सायबर पोलिसांत गुन्हा दाखल अभियंता कोण

**अकोला :** महावितरण कंपनीच्या अकोला शहर विभागातील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून एका नामांकित शासकीय कंत्राटदाराला कोट्यवधी रुपयांच्या टेंडर प्रक्रियेतून बाद करण्यासाठी 'फेक ई-मेल' पाठविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या व्यावसायिक षडयंत्रामुळे कंत्राटदाराचे तब्बल १० ते १५ कोटी रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांची मोठी बदनामीही झाली आहे. या सर्व प्रकरणात अकोट ग्रामीण, अकोला ग्रामीण व अकोल्याचा संदर्भ देत खोटा ईमेल पाठविणारा महावितरणचा तो अभियंता कोण असा प्रश्न आता विचारला जात आहे.

याप्रकरणी अकोला सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टेंडरमधून बाद करण्यासाठी बनावट ई-मेलचा वापर करत गणेश सारसे यांच्या 'अर्णव इलेक्ट्रिकल्स' या कंपनीची बदनामी केली आहे. गेल्या अनेक

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

वर्षांपासून महावितरण कंपनीमध्ये अधिकृत शासकीय कंत्राटदार म्हणून कार्यरत आहेत. महावितरणने काढलेल्या निविदांनुसार त्यांनी नाशिक परिमंडळांतर्गत येणाऱ्या कळवण, चांदवड, नाशिक ग्रामीण, नाशिक अर्बन-१ आणि नाशिक अर्बन-२ या पाच ठिकाणांसाठी ऑनलाईन पद्धतीने टेंडर भरले होते. कळवण विभागाने त्यांना टेंडर प्रक्रियेतून अचानक बाद केल्याचे ई-मेलद्वारे कळवले. सारसे यांनी यावर चौकशी केली असता, अकोला अर्बन शहर विभागाकडून आलेल्या एका ई-मेलचा दाखला देत त्यांना बाद करण्यात आल्याचे सांगण्यात आले. पुरावे नष्ट करण्याचा आणि जीवाचा धोका असल्याचा आरोपफिर्यादी गणेश सारसे यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, महावितरण शहर विभाग अकोला येथील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एक गट (टोळी) तयार करून हा कट रचला आहे. कंत्राटदाराला संपूर्ण महाराष्ट्रातून काम मिळू नये आणि त्यांचे व्यावसायिक नुकसान व्हावे, याच हेतूने हा बनावट ई-मेल पाठवण्यात आला होता. इतकेच नव्हे तर गुन्हा उघडकीस येऊ नये म्हणून संबंधित विभागांना पाठवलेला तो बनावट ई-मेल डिलीट करून पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून करण्यात आला आहे. या कटकारस्थानामुळे आपल्या जीवाला धोका असल्याचेही फिर्यादीने म्हटले आहे. सायबर पोलिसांकडून गुन्हा दाखलया गंभीर आर्थिक आणि संगणकीय गुन्ह्याची दखल घेत अकोला सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धर्मेंद्र त्र्यंबकराव जोशी यांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. अज्ञाताविरोधात दाखल या गुन्ह्यातील आरोपी सायबर पोलिसांना मिळतील काय अशी विचारणा आता होत आहे.

# देवरी पंचमुखी महादेव मंदिरात चोरी करण्याचा प्रयत्न फसला



प्रतिनिधी २९ मे

**अकोट :** विदर्भामध्ये सुप्रसिद्ध असलेले पंचमुखी महादेव मंदिर अनेक भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असून चोरट्याने मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावरील कॅमेरा तोडून मंदिराच्ये मुख्य दरवाज्याचा कुलूप कोंडा तोडून आत मध्ये प्रवेश केला व मंदिरामधील दानपेटी व महादेवाला स्नान करण्याची तांब्याची बकेट व गळवा आणि चोरून नेला मंदिरामधील दानपेटी २ माणसांना .न.हलणारी दानपेटी बाहेर काढून दोनशे मीटर मंदिराच्या परिसरामध्ये ओढत नेऊन पेटीमधील चिल्लर रुपये खाली पडलेले आढळले. सीसीटीव्ही कॅमेरे यामध्ये चोरट्याची प्रक्रिया कैध झाली आहे . चोरट्याने अथक प्रयत्न करून ईश्वर कृपेने काही हाती लागले नाही. मोजक्याच चिल्लर रकमेवर त्याला ताव मारावा लागला. दानपेटी ही खूप मोठ्या मजबूत पद्धतीने फिट केली होती परंतु त्याने ती कशी बाहेर काढली हेच एक कोडे गावकऱ्यांपुढे उभे राहिले. याच परिसरामध्ये गेल्या कित्येक महिन्यांपासून चोरीचे बैल गाय गोरे ढोरे व इतरही चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात सत्र चालूच आहे यावर पोलीस प्रशासनाने आजपर्यंत कुठल्याही घटनेचा अंकुश लावला नाही, उलट दिवसान दिवस चोरीचे वाढते प्रमाण नागरिकांना आव्हान देत आहे. संबंधित चोरटा हा कोण आहे याबाबत उलघडा दहीहंडा ठाणेदार हे करणार आहे त्यामुळे गावकऱ्यांचीउत्सुकता शिगेला पोहोचली आहे. गावात ही वार्ता वाऱ्यासारखी पसरतात गावकरी मोठ्या संख्येने हजर झाले तेव्हा ठाणेदार यांनी तात्काळ तपासाची चक्र फिरवून चौहटा बीट जमादार गोलाईत मेजर खांडवाय मेजर इतर सहकारी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन फॉरेन्सिक लॅब श्वान पथक यांना प्रचारण करण्यात आले परंतु श्वानला देवरी गावच्या मुख्य रस्त्यापर्यंत दिशादर्शक मिळाले तेथे श्वान शांत झाला. पुढील तपास दहीहंडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार च्या मार्गदर्शनावर गोलाईत मेजर व त्यांचे सहकारी करत आहे, या तपासाकडे सर्व परिसरातील नागरिकांची लक्ष लागले आहे.

# मेलेली मुलगी जिवंत परतल्याने एकच खळबळ

प्रतिनिधी २९ मे

**जळगाव जामोद :** काही दिवसांपूर्वी जळगाव जामोद परिसरातील राजूरा शिवारात सापडलेल्या शीरविहीन तरुणीच्या मृतदेहामुळे संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणाचा तपास करत बुलढाणा थ्ँ ने मध्यप्रदेशातील बऱ्हाणपूर जिल्ह्यातून एका तरुणीच्या वडिलांना आणि भावाला ताब्यात घेतले होते. संबंधित तरुणीची हत्या करून मृतदेह फेकल्याचा गंभीर संशय पोलिसांनी व्यक्त केला होता. मात्र आता या प्रकरणात असा धक्कादायक ट्विस्ट समोर आला आहे, ज्यामुळे संपूर्ण तपासावरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले ज्या मुलाचा मृतदेह असल्याचा दावा केला जात होता, ती जळगाव जामोद 'शीरविहीन मृतदेह. ज्या मुलीचा मृतदेह असल्याचा दावा केला जात होता, ती मुलगी चक्क जिवंत असल्याचे समोर आले आहे. संबंधित तरुणी स्वतः बऱ्हाणपूर पोलिसांसमोर हजर झाली असून 'मी जिवंत आहे, माझ्या वडिलांना आणि भावाला सोडा,' अशी आर्त मागणी तिने केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सध्या तिला बऱ्हाणपूर येथील 'सखी वन स्टॉप सेंटर'मध्ये ठेवण्यात आले



आहे. या घटनेनंतर संपूर्ण प्रकरणाने वेगळेच वळण घेतले आहे. जळगाव जामोद येथे सापडलेला तो शीर नसलेला मृतदेह नेमका कोणाचा होता अहवाल येण्यापूर्वीच पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेण्याची घाई का केली? केवळ संशयाच्या आधारावर तपासाची दिशा ठरवण्यात आली का? की या प्रकरणामागे आणखी अनेक प्रश्न आता या धक्कादायक घडामोडीनंतर बुलढाणा थ्ँ च्या तपास पद्धतीवर नागरिकांकडून तीव्र प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता खरी मृत व्यक्ती कोण, तिची ओळख काय आणि खरे आरोपी कोण आहेत, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये मोठा संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तेल्हारा-अडगाव परिसरात वरली मटक्याचा धुमाकूळ !

प्रतिनिधी २९ मे

**अकोला :** तेल्हारा आणि अडगाव अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागात सध्या वरळी मटक्यासारख्या अवैध धंद्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे. गावागावांत सर्रासपणे सुरू असलेल्या या जुगार अड्ड्यांमुळे तरुण पिढी बरबाद होत असतानाच, आता लहान लहान शाळकरी मुलांनाही या वरळी मटक्याच्या नादी लावले जात असल्याचा अत्यंत धक्कादायक आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संपूर्ण बेकायदेशीर व्यवसायाला स्थानिक तपास यंत्रणेतील बड्या अधिकाऱ्यांचा छुपा पाठिंबा आहे की काय ? अशी शंका आता उपस्थित केली जात आहे.

अवैध धंद्यांवर कारवाईचा आव आणणारी तपास यंत्रणा केवळ थातुरमातुर कारवाई करत असल्याचा

◆ लहान मुलांचे भविष्य पणाला

दावा नागरिकांनी केला आहे. मटका बहाद्दरांना ताब्यात घ्यायचे, त्यांच्यावर वारंवार जुगार ॲक्टच्या १२ (अ) अंतर्गत अवघ्या तीनशे रुपयांची दंडात्मक कारवाई करायची आणि पुन्हा सोडून द्यायचे, असा संशयास्पद खेळ स्थानिक पातळीवर सुरु आहे. ही नाममात्र कारवाई म्हणजेच जुगारांना दिलेले एकप्रकारे अभयच ठरत आहे. या वरळी मटक्याच्या विळख्यामुळे ग्रामीण भागातील शेकडो गरिबांचे संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. मटक्याचे व्यसन जडलेल्या नवऱ्यांमुळे घरात दररोज पैशांवरून वाद होत असून, महिलांना आपल्या पतीकडून प्रचंड मानसिक आणि शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हक्काची मजुरी मटक्यात उडवून दिली जात असल्याने मुलांच्या शिक्षणाचा आणि खाण्यापिण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरातील ज्या गावांमध्ये सध्या कोणतीही भीती न बाळगता सर्रासपणे वरळी मटका सुरू आहे आणि जिथल्या ग्रामस्थांच्या तक्रारी पोलीस प्रशासनाने केराची टोपली दाखवली आहे, अशा गावांची एक धक्कादायक यादीच आता समोर आली आहे.रौंदळा, अटकळी, टाकळी, मनब्दा, दापुरा, पीवंदळ, हनवाडी, नेर, धामना, बोरगाव वैराळे, सोनाथ, अंदुरा, मनात्री, उमरी, आरसूळ, घोडगाव, डौला आणि वांगरगांव या गावांचा यामध्ये समावेश आहे.या सर्व गावांमध्ये राजरोसपणे मटक्याचे आकडे लिहिले जात असून, एजंट गल्लोगल्ली फिरत आहेत.तपास यंत्रणेच्या या ढिसाळ आणि संशयास्पद कारभारामुळे आता ग्रामस्थ स्वतः कायदा हातात घेण्याच्या मनःस्थितीत आहेत.

# ई-केवायसीच्या निमित्ताने घराबाहेर पडलेली विवाहित महिला बेपत्ता

प्रतिनिधी २९ मे

**मलकापूर :** तालुक्यातील दाताळा येथील कोळीवाडा परिसरातून दि. २६ मे रोजी ई-केवायसी करण्यासाठी मलकापूरला जात असल्याचे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहित महिला बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सौ. आशा निवृत्ती चंडोल (वय ३० वर्षे), मूळ रा. टिटवी, ता. सोयगाव, जि. संभाजीनगर व सध्या रा. कोळीवाडा, दाताळा या दि. २६ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास 'लाडकी बहीण' योजनेचे पैसे खात्यात जमा होत नसल्याने ई-केवायसी करण्यासाठी मलकापूर येथे जात असल्याचे सांगून घरातून निघून गेल्या होत्या. त्यानंतर त्या परत न आल्याने त्यांच्या नातेवाईकांनी गावात तसेच इतर संभाव्य ठिकाणी शोध घेतला. याबाबत सविता उखा वरकडे (वय ६० वर्षे, रा. कोळीवाडा, दाताळा) यांनी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. बेपत्ता महिलेची उंची सुमारे ५ फूट असून रंग सावळा आहे. अंगात पिवळ्या रंगाची लाल डिझाइनची साडी, गुलाबी रंगाचा ब्लाउज, कपाळावर काळी गोंदलेली टिकली, लांब काळे केस, पायात गुलाबी रंगाची सँडल तसेच गळ्यात सोन्याची पोत व कानात रिंगा असल्याचे वर्णन देण्यात आले आहे.

# जिल्हाध्यक्ष तायडे, महानगराध्यक्ष गवई यांच्या पदग्रहणातून काँग्रेसचे शक्तिप्रदर्शन

प्रतिनिधी २९ मे

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील काँग्रेस संघटनेला नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला जिल्हा ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष प्रकाश तायडे आणि महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई यांच्या पदग्रहण सोहळ्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापविले. स्वराज भवन येथे झालेला हा कार्यक्रम केवळ पदग्रहणापुरता मर्यादित न राहता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नव्या संघटनात्मक रणनीतीचे शक्तिप्रदर्शन ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. गेल्या काही वर्षांपासून अकोला जिल्ह्यात संघटनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेल्या काँग्रेसला नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून आक्रमक व गतिमान चेहरा देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून स्पष्टपणे दिसून आला. पक्षातील ज्येष्ठ नेतृत्व, माजी पदाधिकारी, युवक कार्यकर्ते आणि विविध फ्रंटल सेलच्या प्रतिनिधींनी एकाच मंचावर उपस्थित राहत संघटनात्मक एकजुटीचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमस्थळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहिलेल्या कार्यकर्त्यांमुळे काँग्रेसमध्ये नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. माजी मंत्री प्रा. अजहर हुसेन यांनी आपल्या भाषणात केंद्र सरकारवर थेट टीका करत देशातील जनतेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाविषयी नाराजी वाढत असल्याचा दावा केला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाकडे पर्याय म्हणून पाहिले जात असून




आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसला त्याचा लाभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नव्या नेतृत्वाकडे संघटनात्मक ताकद वाढविण्याची मोठी जबाबदारी असून प्रकाश तायडे आणि महेंद्र गवई हे दोघेही जनसंपर्कात सक्रिय, पक्षनिष्ठ आणि कार्यकर्त्यांना एकत्र बांधून ठेवण्याची क्षमता असलेले नेते असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ काँग्रेस नेते तथा माजी आमदार लक्ष्मणराव तायडे यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सर्व स्तरांवरील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याचा मोलाचा सल्ला दिला.

ग्रामीण भागातील काँग्रेसची पारंपरिक ताकद पुन्हा उभी करण्याची क्षमता प्रकाश तायडे यांच्यात असून शहरातील काँग्रेस संघटनेला नव्याने सक्रिय करण्याचे काम महेंद्र गवई करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नव्या नेतृत्वाने केवळ पदाधिकारी न राहता कार्यकर्त्यांचा आधार बनावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. आमदार साजिद खान पठाण यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल करत काँग्रेस जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष उभारेल, असा इशारा दिला. राज्य विधिमंडळात सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर अकोल्यातील 'उर्दू घर' प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने जीआर मंजूर केल्याची माहिती त्यांनी दिली. माजी आमदार बबन चौधरी यांनी आगामी काळात अकोला जिल्ह्यात काँग्रेसची

## 'गाव तिथे काँग्रेस शाखा'वर भर : प्रकाश तायडे

नवनियुक्त जिल्हा ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष प्रकाश तायडे यांनी आपल्या भाषणात काँग्रेसची संघटनात्मक ताकद बूथ स्तरापर्यंत वाढविण्यावर भर देणार असल्याचे स्पष्ट केले. राहुल गांधी यांच्या विचारांना ग्रामीण भागापर्यंत पोहोचवत सामाजिक न्याय, शेतकरी प्रश्न, बेरोजगारी आणि महागाईविरोधात जनआंदोलन उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. संघटनात्मक ताकद वाढवून आगामी प्रत्येक निवडणुकीत विरोधकांना पराभूत करणार असल्याचे सुद्धा ते म्हणाले. सोबतच सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात काँग्रेस अधिक आक्रमक भूमिका घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## शहर काँग्रेसकडून हेल्पलाइन सुरू करणार : महेंद्र गवई

महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई यांनी शहरातील प्रत्येक प्रभागात काँग्रेसचे कार्यकर्ते सक्रिय करण्याचा संकल्प व्यक्त केला. युवकांना पक्षाशी जोडण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून नागरिक, महिला आणि युवकांच्या समस्या सोडविण्यासाठी शहर काँग्रेस कमिटीकडून हेल्पलाइन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. काँग्रेस ही केवळ निवडणूक लढविणारी संघटना नसून सामाजिक बांधिलकी जपणारी विचारधारा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राजकीय ताकद वाढताना दिसेल, असा दावा करत संघटनात्मक एकजूट आणि कार्यकर्त्यांची ऊर्जा हेच पक्षाचे खरे बलस्थान असल्याचे सांगितले. बदलत्या राजकीय परिस्थितीत काँग्रेस पुन्हा प्रभावी शक्ती म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात काँग्रेस नेते प्रशांत पाचडे, ॲड. महेश गणगणे, आकाश कवडे, डॉ. सुधीर ढोणे, डॉ. संजीवनी बिहाडे, कपिल रावदेव यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, अशोक अमानकर, डॉ. जीशान हुसैन, प्रशांत गावंडे, मो. इरफान, गुड्डू पठाण, प्रमोद डोंगरे, कशीश खान, निनाद मानकर, अतुल ढोले, मो. अकरम, मो. असद, मो. शारिक, सत्यनारायण घाटोळे, सारंग मालानी, रमेश बेटकर, गजानन वानखेडे, राजेश गावंडे, राजुभाऊ जोगदंड, शेख मुख्तार, सैय्यद जहांगीर, अभिजीत तवर, प्रशांत प्रधान, मनिष मिश्रा, तश्वर पटेल, यांच्यासह काँग्रेसच्या विविध आघाड्या व फ्रंटल सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विजय देशमुख यांनी केले.

# वाशीम येथील जनगणना परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी २९ मे

**पातुर :** येत्या सात जून रोजी वाशिम शहरात सावता परिषदेच्या वतीने जनगणना परिषदेचे आयोजन करण्यात येणार असून. यात महाराष्ट्रातील सावता परिषदेचे व ओबीसीच्या विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहून जनगणना व ओबीसी या विषयावर सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय जनगणना परिषदेचे आयोजन सावता परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

या जनगणना परिषदेच्या आयोजनासाठी रविवार दिनांक २४/५/२०२६ वाशीम,अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची नियोजनाची बैठक विश्रामगृह वाशिम



येथे पार पडली. यात विविध विषयावर चर्चा करून ही परिषद यशस्वी करण्यासाठी सांगोपांग चर्चा करण्यात आली. ही बैठक सावता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली सावता परिषदेचे प्रदेश सहसचिव प्रवीण भाऊ वाघमारे,प्रदेश उपाध्यक्ष रविभाऊ भांदुर्गे अकोला जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव जी निखाडे, खामगाव जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ जावळकर वाशिम जिल्हा अध्यक्ष विलास ढगे,महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रंजनाताई परिसकर, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष शेखर जटाळे वाशिम जिल्हा उपाध्यक्ष रविभाऊ वानखेडे वाशिम शहराध्यक्ष चेतन इंगोले, पातुर तालुका अध्यक्ष अजय ढोणे अकोला जिल्हा उपाध्यक्ष छोटू भाऊ काळपांडे वाशिम तालुका अध्यक्ष बाळूभाऊ माल, खामगाव येथून अमोल धामणकर, अमोल चरखे,गजानन उठाळे मंगरूळपीर तालुका अध्यक्ष चेतन शिंदे रिसोड महिला आघाडी शहराध्यक्ष रेखाताई जहीरव रिसोड महिला आघाडी तालुका अध्यक्ष,दिपाली ताई काळे, अकोला महानगर अध्यक्ष दिनेश जी सोळंके,मंगलाताई भांदुर्गे, शितल जाधव,ज्योती जाधव,नीता जाधव,वंदना वानखडे, सुनिता पुंड, ज्योति इरतकर,अपर्णा सोनवणे,गोदावरी रतकर, गीता भांदुर्गे, ज्योती सोनवणे,शोभा इरतकर, वंदना भांदुर्गे ,सह तिन्ही जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर सावता परिषदेचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते सर्व यावेळी सर्वानुमते सात जून ची जनगणना परिषद यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. यावेळी गजानन ठेंगडे,अमोल गाभणे, सुनील वानखेडे,आकाश गायकवाड, रवी खोटे,यांना सावता परिषदेत प्रवेश देण्यात आला जनगणना परिषद साठी पातूर तालुक्यातील दंम बांधवांनी या कार्यक्रमा साठी मोठ्या मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान सावता परिषद पातुर तालुका अध्यक्ष अजय ढोणे यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK